POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१६३ ● मुंबई, बुधवार, ०४ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## 'मराठी माणसांच्या नाकावर टिच्चून अमराठी महापौर'
## मीरा-भाईंदरमध्ये मराठी एकीकरण समितीचा एल्गार

**■ बातमी /लेख, विनोद दशगथ मेढे**

मीरा-भाईंदरमध्ये महापौर पदाच्या निवडीनंतर मराठी-अमराठी हा नवा वाद उफळल्याचं चित्र आहे. मीरा-भाईंदरमध्ये डिंपल मेहता यांची महापौरपदी निवड करण्यात आली आहे. मीरा-भाईंदरमध्ये मराठी माणसांच्या नाकावर टिच्चून अमराठी महापौरपदाची निवड करण्यात आली आहे. यामुळे आता मराठी एकीकरण समितीसह मनसेनं आक्रमक भूमिका घेतल्याचं चित्र आहे.

**मीरा-भाईंदर महापौरपदी भाजपच्या डिंपल मेहता**

मंगळवारी ३ फेब्रुवारी बुधवार रोजी मीरा-भाईंदर महापौरपदाची निवड करण्यात आली. यात भाजपच्या डिंपल मेहता यांनाच महापौरपदी बसवण्यात आलं. डिंपल मेहता यांना ७९ मते मिळवत दुसऱ्यांदा महापौरपद मिळवले. या निवडणुकीनंतर मराठी एकीकरण समितीसह मनसेनं मीरा-भाईंदरमध्ये मराठी महापौर असावा अशी सरकारकडे मागणी केली होती. पण, त्याचा काहीही एक उपयोग झाला नाही. सरतेशेवटी मीरा-भाईंदर महापालिकेत दुसऱ्यांदा अमराठी व्यक्तीस महापौरपदी बसवण्यात आले.

यावरून मराठी एकीकरण समिती आणि मनसे यांनी महापौरपदाच्या विरोधात मोर्चा काढला. मराठी माणूस पेटून



उठणार का? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

**'मराठी माणसांच्या नाकावर टिच्चून महापौर बसवला'**

मराठी भाषा, शहरे टिकावी, मराठी माणसांचं अस्तित्व टिकाव. मुंबई गुजरातमध्ये जाईल या कारणाने संयुक्त महाराष्ट्राचा लढा झाला होता, त्याच लढ्यात १०७ हुतात्म्यांनी जीवाचं बलीदान दिलं आणि मराठी राज्य स्थापन झालं. आता मराठी माणसांच्या नाकावर टिच्चून महापौर बसवला गेला, याला आमचा विरोध असल्याचं सांगत मराठी एकीकरण समितीने एल्गार पुकारला.

### मीरा-भाईंदरमध्ये अमराठी महापौरपदावरून मराठी एकीकरण समितीचं तीव्र आंदोलन, अध्यक्ष म्हणाले, 'नरेंद्र मेहता दुसरे मोरारजी देसाई...'

'डिंपल मेहता दुसऱ्यांदा महापौर होत आहेत, आमचा आधी देखील त्यांना विरोधच होता. नरेंद्र मेहता हे आमदार आहेत, इथं दुसरे मोरारजी देसाई तयार होत आहेत, घराणेशाही देखील पाहायला मिळते', असं वक्तव्य मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांनी केलं आहे. एवढंच नाहीतर त्यांनी आंदोलन तीव्र करू असा देखील इशारा दिला आहे. त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना मराठी महापौरपदाची मागणी पूर्ण केली जावी अशी विनंती केली आहे.

**मीरा-भाईंदर महापालिका निवडणुकीनंतर वातावरण तापलं**

मराठी एकीकरण समितीने पुन्हा आज 3 फेब्रुवारी रोजी आंदोलनाला सुरुवात केली आहे. या घडमोडीमुळे मराठी मुलखातून तीव्र संतापाची प्रतिक्रिया उमटू लागली आहे. भाजपकडून डिंपल मेहता यांच्या नावाची महापौर पदासाठी वर्णी लागणार असल्याची शक्यता आहे. मात्र, याला मराठी एकीकरण समितीसह मनसे देखील विरोध दर्शवला आहे.

**'नरेंद्र मेहता दुसरे मोरारजी देसाई...'**

मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांनी सांगितलं की, रवींद्र चव्हाण आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आमची मागणी आहे की, मीरा-भाईंदर महापालिकेत मराठी महापौर करा. एक महिन्यांपासूनच आमची मागणी आहे. डिंपल मेहता दुसऱ्यांदा महापौर होत आहेत, आमचा आधी देखील त्यांना विरोधच होता. नरेंद्र मेहता हे आमदार आहेत, इथं दुसरे मोरारजी देसाई तयार होत आहेत, घराणेशाही देखील पाहायला मिळते.

**'मीरा-भाईंदर शहर आगरी कोळ्यांचे'**

आम्हाला पोलिसांनी नोटीस दिल्यात, पण आम्ही देखील पोलिसांना सांगतो की, आम्ही मीरा-भाईंदर महापालिकेपर्यंत जाऊ. एवढा विरोध करूनही मराठी महापौर बसणार नसेल आणि डिंपल मेहताच महापौर होणार असतील तर आंदोलन अधिक तीव्र होईल. आगरी कोळ्यांचे मीरा-भाईंदर शहर आहे.



## मराठी एकीकरण समिती आक्रमक

**■ भाईंदर। प्रतिनिधी,**

मिरा-भाईंदर शहरासाठी मराठी महापौर द्यावा, या मागणीसाठी मराठी एकीकरण समितीमार्फत आयोजित करण्यात आलेला मोर्चा पोलिसांनी रोखला आहे. त्यामुळे आंदोलनकारी संतप्त झाले असून पोलिसांसोबत धक्काबुक्की झाल्याची घटना घडली. मिरा-भाईंदर महापालिकेवर महापौर पदासाठी एकहाती सत्ता स्थापन करणाऱ्या भाजप पक्षाने डिंपल मेहता यांच्या नावाची निवड केली आहे. मात्र यावर मराठी एकीकरण समितीकडून आक्षेप नोंदवण्यात आला आहे. शहरासाठी मराठी महापौर द्यावा, अशी मागणी समितीकडून करण्यात आली आहे. त्यासाठी मंगळवारी समितीकडून मोचार्चे आयोजन करण्यात आले होते. हा मोर्चा भाईंदर पश्चिम येथील सुभाषचंद्र बोस मैदानातून महापालिका मुख्यालयाकडे जाणार होता.मात्र या मोर्चामुळे समाजात अस्थिरता निर्माण होण्याची शक्यता असल्याचे कारण देत पोलिसांनी समितीच्या पदाधिकाऱ्यांना आदल्या दिवशीच नोटीस बजावली होती. तसेच मोर्चाच्या ठिकाणी जाऊन काही आंदोलनकर्त्यांना सकाळीच ताब्यात घेतले. त्यामुळे संतप्त झालेल्या आंदोलनकर्त्यांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली.



वरिष्ठ पत्रकार लक्ष्मीकांत पोपळे सन्मान स्वीकारताना



## पत्रकारिता, निवेदन आणि समाजकार्याचा मानबिंदू
## ठाण्यात लक्ष्मीकांत पोपळे यांचा कौतुक सन्मान!!!

**■ ठाणे। प्रतिनिधी,**

पत्रकारिता, प्रभावी निवेदन, चित्रपट निर्मिती-दिग्दर्शन तसेच सामाजिक कार्य या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल श्री. लक्ष्मीकांत पोपळे यांचा कोतुक सन्मान रविवारी दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी ठाणे येथे संपन्न झालेल्या Asian Youth Image Conference & Award Ceremony – 2026 या भव्य कार्यक्रमात करण्यात आला.

इमेज इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्स (IIORC मान्यताप्राप्त) संस्थेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून निवडलेल्या १३० मान्यवरांचा गौरव करण्यात आला. त्यामध्ये पत्रकारिता व माध्यम क्षेत्रात सकारात्मक विचार मांडणारे, प्रभावी निवेदक म्हणून कार्यक्रमांना सुसंस्कृत दिशा देणारे, तसेच चित्रपट निर्मिती व दिग्दर्शनातून सामाजिक आशय अधोरेखित करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून श्री. पोपळे यांच्या कायार्ची विशेष दखल घेण्यात आली.


सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य सातत्याने करत असलेल्या श्री. लक्ष्मीकांत पोपळे यांचा हा सन्मान तरुण पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

या सन्मान सोहळ्यास प्रशासकीय अधिकारी, मान्यवर पाहुणे, पुरस्कारार्थी, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री. पोपळे यांच्या कार्याचा झालेला हा गौरव माध्यम व सामाजिक क्षेत्रासाठी अभिमानास्पद ठरला आहे.

## बीएमसीने अखेर अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली

**■ मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतील अलेक भागांमधील फेरीवाल्यांसह अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आल्यानंतर हिंमत असेल तर भेंडीबाजार, मोहमद अली रोडवरील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करून दाखवा असे महापालिकेला सुनावणाऱ्या मुंबईकरांना आज महापालिकेने तिथेही कारवाई करून आम्ही मनात आणले तर कुठेही कारवाई करू शकतो हे दाखवून दिले आहे. मुंबई महापालिकेच्या बी विभागाच्यावतीने अत्यंत गजबजलेले व्यापारी रस्ते म्हणून ओळखल्या जाणा-या मोहम्मद अली मार्ग आणि इब्राहिम मर्चंट मार्ग परिसरातील पदपथांवरील अनधिकृत वाढीव बांधकामांवर सोमवारी २ फेब्रुवारी रोजी कारवाई करण्यात आली. मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त डॉ अश्विनी जोशी यांच्या निर्देशानुसार तसेच परिमंडळ एकच्या उपायुक्त पदी नियुक्त झालेल्या चंदा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली बी विभागाच्या सहायक आयुक्त योगेश देसाई यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.मोहम्मद अली मार्ग हा भेंडीबाजार, मशीद बंदर आणि भायखळा परिसराला जोडणारा प्रमुख रस्ता आहे. इब्राहिम मर्चंट मार्ग हा रस्ता नागदेवी आणि मांडवी परिसराच्या जवळ आहे. हे दोन्ही रस्ते व्यापारी दृष्टीने आणि रहदारीच्या दृष्टिने खूप महत्त्वाचे आहेत. या दोन्ही मार्गावरील पदपथांवर अनधिकृत वाढीव बांधकामे आढळून आली होती. तसेच, या परिसरात अनधिकृत फेरीवाल्यांनीही दुकाने उभी केल्याचे निदर्शनास आले होते. यामुळे, वाहनचालकांना मार्गक्रमण करण्यास तसेच पादचाऱ्यांना पदपथांवर चालण्यास अडथळा निर्माण होत होता.



याच पार्श्वभूमीवर, मुंबई महानगरपालिकेच्या 'बी' प्रशासकीय विभागाकडून निष्कासनाची मोहीम हाती घेण्यात आली. या अंतर्गत, या परिसरातील अनधिकृत फेरीवाले, पदपथांवरील अनधिकृत वाढीव बांधकामांचे निष्कासन करण्यात आले. ७ अनधिकृत दुकाने हटविण्यात आली. तसेच, १२ ओटे, पत्र्याचे लोखंडी शेड, १० बोलार्ड, २ बेवारस वाहनांवर कारवाई करण्यात आली. अतिक्रमण निर्मूलनाची ०४ वाहने, ०२ जेसीबी आणि अन्य संयंत्राच्या सहाय्याने हटवण्यात आले. या कारवाईदरम्यान महानगरपालिकेचे ४० अधिकारी - कर्मचारी यांच्यासह पुरेसा पोलिस बंदोबस्त नेमण्यात आला होता. या कारवाईबद्दल स्थानिक नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. आगामी काळातही अनधिकृत / वाढीव बांधकामांविरोधात नियमितपणे कारवाई सुरूच राहील, असे महानगरपालिका प्रशासनाकडून कळविण्यात येत आहे.

## जिल्ह्यात १२०० बनावट लाभार्थी उघडकीस
## पुण्यात पुरुष 'लाडके' आता सव्वादोन लाख बहिणींसाठी...

**■ पुणे। प्रतिनिधी,**

पुणे जिल्ह्यात लाडक्या बहिणींना 'ई-केवायसी' केल्यानंतरही अनुदानाचा लाभ मिळत नसल्याने त्या सव्वादोन लाख बहिणींची थेट पडताळणी होणार आहे. मात्र, आतापर्यंत जिल्ह्यात १२०१ पुरुष लाभार्थी लाभ घेत असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली असून, त्यामध्ये सर्वाधिक हवेलीसह पुण्यातील ४८७ पुरुष लाभार्थ्यांचा समावेश आहे. आता 'ई-केवायसी' झालेल्या लाभार्थ्यांसह ते खरोखरच पुरुष लाभार्थी आहेत का याचाही शोध घेण्यात येणार आहे.

राज्यात लाडक्या बहिणींना देण्यात येणाऱ्या दीड हजार रुपयांच्या अनुदानापासून अनेक बहिणी वंचित राहत आहेत. सरकारने लाडक्या बहि णींना 'ई-केवायसी' करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, यामध्ये अनेक अडचणी आल्या होत्या. अर्ज सबमिट केल्यानंतरही बहि णींना अनुदान सुरू झाले नाही.




ज्यांच्या घरी चारचाकी आहेत त्यांना अनुदान सुरू राहिले. मात्र, ज्यांच्या घरी चारचाकी नाही, सरकारी नोकरी नाही किंवा पेन्शनही नाही अशा लाभार्थ्यांना अनुदान बंद झाले. अनेक लाभार्थी महिलांनी तक्रारी केल्याने त्यांची दखल घेऊन महिला व बाल विकास विभागाने 'ई-केवायसी' झालेल्या सर्व महिला लाभार्थ्यांची पुन्हा पडताळणी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार, जिल्हा प्रशासनाच्या सूचनेनुसार, अंगणवाडी सेविकांमार्फत आता चौकशी केली जाणार आहे.

लाभार्थी महिलांपैकी त्यांच्या घरात सरकारी नोकरीसाठी कोणी आहे का किंवा त्यांच्या कुटुंबीयांपैकी कोणाला सरकारची पेन्शन मिळत आहे का, याची पडताळणी करण्यात येणार आहे. सरकारी नोकरदार असेल किंवा पेन्शनधारक कोणी असेल, तर त्या कुटुंबातील लाभार्थीही अपात्र ठरणार आहे. त्या दोन्हीपैकी कोणीही घरात नसेल किंवा त्याचे लाभार्थी नसतील, तर ती महिला योजनेची लाभार्थी ठरेल.लाडकी बहीण योजनेचा महिलांप्रमाणे पुरुषही लाभ घेत असल्याची शंका उपस्थित केल्यानंतर शहानिशा करण्याचे सरकारने ठरवले आहे. त्याबाबत संबंधित जिल्ह्यातील प्रशासनाला पुरुष लाभार्थ्यांचा शोध घेण्याचा आदेश दिला आहे.

जिल्ह्यात दोन लाख २५ हजार ३६० लाभार्थ्यांची पडताळणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार अंगणवाडी सेविकांमार्फत या महिलांची पुन्हा पडताळणी केली जाणार आहे. त्यामध्ये सर्वाधिक लाभार्थी हवेली तालुक्यातील (९६ हजार १०) आणि पुण्यातील (२३ हजार) आहेत. राजगड तालुक्यात केवळ २० आणि इतर सात अशा लाभार्थ्यांची पडताळणी करण्यात येणार आहे.

## पाण्याच्या टाकीत मानवी हाडांचा सापळा




**■ वसई। प्रतिनिधी,**

वसईच्या माणिकपूर येथील एका चाळीच्या रिकाम्या पाण्याच्या टाकीत पुरुषाच्या हाडांचा सापळा आढळल्याने खळबळ उडाली आहे. ही टाकी वापरात नव्हती. अनेक वर्षांपासून मृतदेह टाकीत असल्याने मृतदेहांच्या हाडांचा सापळा झाला आहे. मृतदेहाची ओळख पटविण्याचे हाडे न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहे. माणिकपूर पोलिसांनी अपमृत्यूचा गुन्हा दाखल केला असून त्या दृष्टीने तपास सुरू करण्यात आला आहे.

वसई पश्चिमेच्या माणिकपूर गावातील फडबाव शेजोळ येथे बारकुल्या नावाची दुमजली चाळ आहे. गावातील आल्मेडा नामक महिलेच्या मालकीची ही चाळ आहे. या चाळीत एकूण १० खोल्या आहेत. वसई स्थानकात व्यवसाय करणारे फेरीवाले या चाळीत राहतात. दरम्यान, या दुमजली चाळीच्यावर गच्ची (टॅरेस) आहे. टॅरेसवर जुनी पाण्याची टाकी आहे. मात्र ती कधी वापरात नव्हती. त्यामुळे पाण्याची टाकी तोडण्याचा निर्णय चाळ मालकाने घेतला. २९ जानेवारीपासून ब्रेकर मशीनच्या सहाय्याने टाकी पाडण्याचे काम सुरू होते.

३१ जानेवारी रोजी संध्याकाळी साडेचारच्या सुमारास टाकीच्या उत्तर बाजूची भिंत अर्धवट तोडण्यात आली. त्यावेळी कामगारांना मानवी हाडांचे तुकडे आणि कवटी आढळली. त्वरीत माणिकपूर पोलिसांना पाचारण करण्यात आले. संपूर्ण टाकीची पाहणी केली असता कवटी, हाडांचे अनेक तुकडे, शर्ट, पॅण्ट आढळून आले. हाडांचा सापळा तपासणीसाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेत (फॉरेन्सिक लॅब) पाठविण्यात आला आहे. प्रथमदर्शनी पुरुषाच्या हाडांचा सापळा आहे. हे स्पष्ट झाले आहे.

**मानवी सापळा अनेक वर्ष जुना**

सुरेश आल्मेडा (४६) हे चाळीची देखभाल दुरुस्ती करतात. ही चाळ ३० वर्षे जुनी असून माज्या मावशीची आहे. पाण्याची टाकी बांधली होती मात्र ती वापरात नव्हती. पालिकेच्या नळाचे पाणी भाडेकरू वापरत होते असे ते म्हणाले. टॅरेसवर कुणी जात नव्हते. दोन वर्षांपासून टॅरेसचे गेट बंद होते. टाकीत हा मृतदेह असला तरी कधीही कसल्याही प्रकारची दुगंर्धी कुणाला आली नव्हती असेही आल्मेडा यांनी सांगितले. सध्या माणिकपूर पोलिसांनी या प्रकरणाची कलम १९४ अन्वये अपमृत्यूची नोंद केली आहे. या चाळीत फेरीवाले राहतात. हा मृतदेह देखील ३५ ते ४० वर्षांच्या फेरीवाल्याचा असल्याची शक्यता आहे. आम्ही मागील ५ वर्षांतील बेपत्ता इसमांची माहिती तपासत आहोत असे या प्रकरणाचे तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक हरिष पाटील यांनी सांगितले. या मानवी हाडांजवळ आढळलेल्या एका शर्टावर टेलरचे लेबल आहे.

## सत्तेच्या खुचीर्साठी पोटच्या मुलीचा काढला काटा... ६ वर्षांच्या चिमुकलीला तेलंगणाला नेलं अन्...

**पोलिसांचा तपास**

मिळालेल्या माहितीनुसार, निजामाबादमधील निजामसागर कालव्यात एका ६ वर्षांच्या मुलीचा भयानक अवस्थेत मृतदेह आढळला. त्यानंतर, या घटनेची माहिती मिळताच बोधन ग्रामीण पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी अज्ञात मृतदेहाची ओळख पटवण्याचं काम सुरू केलं. काही तासांतच, मुखेड तालुक्यातील पोलिसांनी बोधन पोलिसांशी संपर्क साधला. तपासादरम्यान, पीडितेचं नाव प्राची असून ती पांडुरंगची मुलगी असल्याचं समोर आलं. काही दिवसांपूर्वी प्राची अचानक गायब झाल्याचे पोलिसांना समजलं.

**■ नांदेड। प्रतिनिधी,**

नांदेडमध्ये वडिलांनी सत्तेसाठी स्वतःच्या मुलीची हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. वृत्तानुसार, आरोपी व्यक्तीला तीन मुले होती आणि त्याला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत सरपंचपदासाठी निवडणूक लढायची होती.

महाराष्ट्र निवडणूक कायद्यातील 'दोन अपत्यांच्या' अटीमुळे तो अपात्र ठरत होता. केवळ, निवडणूक लढवण्यासाठी आरोपीने आपल्या मुलीची हत्या




करण्याचा कट रचला. त्याने तेलंगणात जाऊन स्वतःच्या मुलीची हत्या केली आणि तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावली.

**सरपंच पदाच्या खुचीर्साठी**

**पोटच्या मुलीची हत्या**

तपासादरम्यान, संशय आल्याने अधिकाऱ्यांनी पांडुरंगच्या मोबाईल फोन टॉवर लोकेशनचा शोध घेतला आणि तो प्राचीला तेलंगणाला घेऊन आल्याचं आढळून आलं. त्यानंतर कठोर चौकशीदरम्यान, आरोपीने त्याचा गुन्हा कबूल केला. अधिकाऱ्यांचा असा आरोप आहे की विद्यमान सरपंच गणेश यांनी पांडुरंगला सरपंचपदासाठी निवडणूक लढवण्यास प्रोत्साहित केलं होते.

मात्र, तीन मुलांचा पिता असल्याकारणाने पांडुरंग निवडणूक लढवण्यास पात्र नव्हता. निजामाबादचे पोलीस आयुक्त साई चैतन्य यांनी दिलेल्या माहितीनुसार, सविस्तर तपासानंतर गुन्ह्याची उकल झाली आहे आणि प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात आली असून यासंबंधी पुढील तपास सुरू आहे.

**६ वर्षांच्या मुलीला कालव्यात फेकलं अन्...**

संबंधित प्रकरण हे नांदेडमधील असून येथील केरुड गावातील रहिवासी असलेला पांडुरंग कोंडामंगले याला सोमवारी (१ फेब्रुवारी) अटक करण्यात आली. संबंधित आरोपीने २९ जानेवारी रोजी तेलंगणाच्या निजामाबादमधील निजामसागर कालव्यात आपल्या ६ वर्षांच्या मुलीला फेकलं आणि त्यात तिचा मृत्यू झाला. इतकेच नव्हे तर, आरोपीला हत्येची योजना आखण्यात मदत केल्याबद्दल पोलिसांनी केरुडचे विद्यमान सरपंच गणेश शिंदे यांनाही अटक केल्याची माहिती समोर आली आहे.




संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# महाराष्ट्राला लॉटरी



**मुंबई, पुणे आणि नागपूर ही महाराष्ट्राची महत्त्वाची शहरे आणि येथेच सर्वाधिक प्रकल्प येत आहेत. त्यामुळे या केंद्रांना आर्थिक मदत दरवर्षी म्हणजे या केंद्रांची उर्जितावस्था आणून महाराष्ट्राला आणखी उंचीवर नेऊन ठेवण्यासारखे आहे.**

केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला कर विनियोजनातून राज्याला ९८ हजार ३०६ कोटी रुपये मिळतील असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले, हे यासाठी महत्त्वाचे आहे. कारण आदित्य ठाकरे आणि विरोधी पक्षांनी केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काहीच मिळाले नाही असे रडगाणे लावले. त्याला उत्तर म्हणून फडणवीस यांचे विधान आणि संबंधित आकडेवारी महत्त्वाची आहे. ही रक्कम २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातून मिळणाऱ्या रकमेपेक्षा २० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. तरीही आदित्य ठाकरे म्हणतात त्यामागे केवळ भाजपचा द्वेष आणि स्वतःला सत्ता मिळाली नाही ही खंत आहे, दुसरे काही नाही. महाराष्ट्राला इतकेच नव्हे, तर पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये जे १२.२ लाख कोटी रुपये गुंतवले जाणार आहेत त्यामध्येही महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. मुंबई, पुणे आणि नागपूर येथील प्रस्तावित विकासकेंद्रांना पुढील पाच वर्षात ५ हजार कोटी रुपये मिळणार. मुंबई, पुणे आणि नागपूर हे महाराष्ट्राची महत्त्वाची शहरे आणि येथेच सर्वाधिक आस्थापना आणि विविध प्रकल्प येत आहेत. त्यामुळे या केंद्रांना आर्थिक मदत दरवर्षी म्हणजे या केंद्रांची उर्जितावस्था आणून महाराष्ट्राला आणखी उंचीवर नेऊन ठेवण्यासारखे आहे. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस किंवा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जे म्हणतात महाराष्ट्राला खूप काही दिले आहे हे सत्य आहे. फडणवीस यानी सांगितले त्याप्रमाणे मुंबई, पुणे आणि हैदराबाद या हायस्पीड कॉरिडॉरमुळे महाराष्ट्राच्या विकासाला तर चालना मिळेलच, पण मराठवाडा आणि इतर जे मागास भाग आहेत त्यांच्या विकासाला हातभार लागणार आहे. हायस्पीड रेल्वेमुळे १७० किमीचा प्रवास अवघ्या ४८ मिनिटांत पूर्ण होणार. काँग्रेस नेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी अर्थसंकल्पावर टीका करताना म्हटले, की सुधारणांपेक्षा देखाव्याला प्राधान्य दिले. पण विरोधक म्हणून त्यांची टीकेत काही तथ्य नाही. कारण केंद्राने महाराष्ट्राला आणि देशाला भरपूर काही दिले. महाराष्ट्राला केवळ हायस्पीड रेल्वेच नव्हे, तर अर्थसंकल्पीय तरतुदीमुळेही लाभ होणार आहे. त्यातून महाराष्ट्राचा विकास साध्य होईल. उदाहरणार्थ ग्रामीण रस्त्यांसाठी ३७८ कोटी रुपये मिळणार आहेत, तर इकॉनॉमिक क्लस्टरसाठी २८३ कोटी रुपये आणि पाटबंधारे कामांसाठी २०७ कोटी रुपये. नियोजित शहरीकरण आणि उद्योग तसेच उद्योजकतेला प्राधान्य या द्वारे हा अर्थसंकल्प राज्याच्या शाश्वत विकासासाठी पाया मजबूत करत आहे. विरोधी पक्षांनी राज्याला या अर्थसंकल्पातून काय मिळाले असा सवाल केला. पण त्यांच्या माहितीसाठी ही आकडेवारी सांगणे आवश्यक आहे, की ९८ हजार ३०६ कोटी रुपये मिळाले. यातून महाराष्ट्राची वाटचाल आणखी गतिमान होईल यात शंका नाही. विकसित भारत बनवण्याचे जे पंतप्रधान मोदी यांचे लक्ष्य आहे त्या दिशेने जाणारा हा अर्थसंकल्प भक्कम आहे. उद्योगांना प्रोत्साहन आणि गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती यांना अर्थसंकल्पात देण्यात आलेले महत्त्व हे शाश्वत वाढीसाठी ठोस पाया आहे. पायाभूत क्षेत्रासाठी १२ लाख कोटी रुपयांची तरतूद ही महाराष्ट्राला मिळालेली भेट. त्याशिवाय कृषी, मत्स्य उत्पादनासाठी ५०० तलाव आणि पशुसंवर्धन यासाठी भरीव तरतुदी यामुळे ग्रामीण महाराष्ट्राचे चित्र नक्कीच पालटेल. एकूण महाराष्ट्राला या अर्थसंकल्पातून एक लाख कोटी रुपयांचा लाभ मिळणार आणि यामुळे विरोधकांचे विशेषतः आदित्य ठाकरे यांचे म्हणणे आहे, की महाराष्ट्राला काही मिळाले नाही ते असत्य आहे आणि विरोधक डोके शहामृगासारखे वाळूत खूपसून बसत आहेत असे दिसते. महाराष्ट्रावर टीका होत आहे. कारण महाराष्ट्र राष्ट्रीय खजिन्यात जास्तीत जास्त भर टाकतो आणि तरीही त्याकडे दुर्लक्ष केले जाते ही टीका सर्वथा गैरलागू आहे. शेतकऱ्यांना पुरेसा पाठिंबा नाही अशी टीका होते, पण अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी नारळ, काजू आणि इतर पीक उत्पादक शेतकऱ्यांसाठी बरेच काही आहे. शेतकऱ्यांसाठी काही नाही असे म्हटले तर मत्स्य तलाव, इतर पिकांसाठी अनुदान वगैरे तरतुदी आहे. हा अर्थसंकल्प पूर्ण महाराष्ट्रविरोधी आहे ही उबाठाच्या खासदाराने केलेली टीका ही अत्यंत चुकीची म्हणून विचारात न घेण्याजोगी आहे. विदर्भ आणि मराठवाड्याला अर्थसंकल्पात झुकते माप देण्यात आले नसले तरीही त्या भागाचा कायापालट व्हावा अशी हायस्पीड योजना दिली, पण सर्वात कहर म्हणजे एमएसएमई क्षेत्राला प्रचंड तरतूद करूनही विरोधक त्या क्षेत्राला काही नाही म्हणून बोंब ठोकत आहेत, ही बाब निश्चितच लांच्छनास्पद आहे. खरे तर हा अर्थसंकल्प विकसित भारताकडे पाऊल टाकणारा दमदार अर्थसंकल्प आहे असे फडणवीस म्हणाले. पण विरोधक म्हणतात ते खरे मानले तरीही या अर्थसंकल्पात १२ लाख कोटींची गुंतवणूक शेती, पशुपालन आणि मत्स्य शेती या क्षेत्रांत होणार आहे हे सत्य आहे. हे कसे नाकारता येईल. औद्योगिक सवलतींमुळे मराठवाडा आणि विदर्भ यांसारखे भाग विकासाच्या मार्गावर चालणार. ग्रोथ हबसाठी ५ हजार कोटी रुपये आणि प्रत्येक पाच वर्षात ही योजना ही अत्यंत महत्त्वाची आहे. हा अर्थसंकल्प शेती आणि ग्रामीण विकासाला सर्वात महत्त्व देणारा आहे. जेथे ५९ टक्के ग्रामीण रोजगार आणि ४० टक्के सकल मूल्यवर्धित शेतीतून येते, तेथे कोणतेही सरकार शेतीकडे दुर्लक्ष करू शकणार नाही. देशांतर्गत आकडेवारीशिवाय महाराष्ट्राची आकडेवारीही अर्थसंकल्पात महाराष्ट्राला खूप काही देऊन गेली. काही अभ्यासकांचे आक्षेप बरोबर आहेत. एक म्हणजे शेतीसाठी त्यातल्या त्यात कमी तरतुदी आहेत आणि घर बांधणीसाठी फारसे काही मिळालेले नाही. करव्यवस्था जुनीच ठेवली. पण त्यापेक्षा महाराष्ट्राला काहीच मिळाले नाही हा आक्षेप बरोबर नाही. महाराष्ट्राला अर्थसंकल्पाने बरेच काही दिले.

# अर्थव्यवस्थेच्या वाढीची दुसरी बाजू

**चमकणाऱ्या आकडेवारीच्या पलीकडे सामान्य नागरिकाच्या जीवनात आर्थिक सुरक्षितता आणि स्थैर्य जाणवत नाही; वाढ खरोखर कोणासाठी आहे, हा प्रश्न आता अत्यंत चिंताजनक आहे.**




केंद्रातील भाजप आघाडीचे सरकार भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने वाढणारी असल्याचा दावा सातत्याने करत आहे. जीडीपी वाढीचे आकडे, जागतिक क्रमवारी, गुंतवणुकीच्या घोषणा या सर्वांचा वापर विकासाच्या यशोगाथेसारखा केला जातो. परंतु आकडे आणि वास्तव यांच्यातील दरी दिवसेंदिवस वाढताना दिसते. सामान्य नागरिकाच्या जीवनात सुरक्षितता, स्थैर्य आणि प्रगती जाणवत नसेल, तर आर्थिक वाढीला नेमका अर्थ काय? ही वाढ नेमकी कोणासाठी आहे हा मूलभूत प्रश्न आज देशासमोर उभा आहे. अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती तपासली तर स्पष्ट होते की, विकासाचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत नाही; उलट असमानता, बेरोजगारी आणि असुरक्षितता वाढत आहे.

### असमानतेत ऐतिहासिक वाढ

आज भारतात उत्पन्न आणि संपत्तीची विषमता ऐतिहासिक पातळीवर पोहोचली आहे. वरच्या १० टक्के लोकांकडे देशाच्या उत्पन्नाचा जवळपास ५८ टक्के हिस्सा आहे, तर खालच्या ५० टक्क्यांना केवळ १५ टक्के. संपत्तीचे केंद्रीकरण भयावह वेगाने वाढत आहे. देशाच्या एकूण संपत्तीपैकी सुमारे ४० टक्के संपत्ती केवळ वरच्या १ टक्क्याकडे आहे. ही केवळ आकडेवारी नाही; ही आर्थिक रचनेतील खोलवर असंतुलन दर्शवणारी आहे. जेव्हा संपत्ती काही हातांत अडकते, तेव्हा बाजारातील मागणी कमी होते, अर्थव्यवस्था संकुचित होते आणि वाढ कृत्रिम ठरते.

### मध्यमवर्ग आर्थिकदृष्ट्या पिळवटला

या असमानतेचा सर्वात मोठा फटका मध्यमवर्गाला बसत आहे. पगारवाढ ठप्प आहे, महागाई वाढत आहे आणि जीवनावश्यक खर्च झपाट्याने वाढले आहेत. घरगुती बचत ऐतिहासिक नीचांकावर पोहोचली आहे. शिक्षण, आरोग्य आणि रोजच्या खर्चासाठी कुटुंबांना कर्जाचा आधार घ्यावा लागत आहे. कर्जावर चालणारी अर्थव्यवस्था वरून स्थिर दिसते, पण आतून ती कमकुवत असते. मध्यमवर्ग अस्थिर झाला तर देशातील उपभोगशक्ती कमी होते आणि विकासाची गती मंदावते.

### तरुणाई बेरोजगारीच्या गर्तेत

जीडीपी वाढीचे दावे होत असताना रोजगारनिर्मिती हा सर्वात मोठा अपयशाचा मुद्दा ठरतो. उत्पादन आणि सेवा क्षेत्रे पुरेसे रोजगार निर्माण करण्यात अपयशी ठरली आहेत. उलट मोठ्या प्रमाणावर लोक पुन्हा शेतीकडे वळले आहेत, पण तिथे उत्पन्न कमी आणि अस्थिरता जास्त आहे. स्थिर, सुरक्षित आणि सामाजिक संरक्षण असलेल्या नोकऱ्या वेगाने कमी होत आहेत. कामगार मोठ्या प्रमाणावर असंघटित क्षेत्रात ढकलले जात आहेत. लेखी करार नसलेली नोकरी, सामाजिक सुरक्षेचा अभाव आणि अस्थिर उत्पन्न, ही रोजगार क्षेत्रातील सध्याची कटू वास्तवता आहे.

तरुण पिढीसमोरील संकट आणखी गंभीर आहे. सुशिक्षित तरुण बेरोजगारीच्या गर्तेत अडकले आहेत. अनेकांनी नोकरी शोधणेच सोडले आहे. भारताचा लोकसंख्यात्मक लाभांश ही देशाची मोठी ताकद मानली जात होती; पण रोजगाराविना तरुणाई म्हणजे सामाजिक अस्थिरतेची ठिणगी. अपेक्षाभंग झालेली तरुणाई आर्थिक प्रश्नांना राजकीय आणि सामाजिक संकटात रूपांतरित करू शकते.

### कॉर्पोरेट नफा वाढला, कामगार मागे पडले

या पार्श्वभूमीवर कॉर्पोरेट नफ्याची झपाट्याने वाढ विशेष लक्षवेधी आहे. कंपन्यांचे उत्पन्न आणि नफा वाढले, पण रोजगार आणि वेतनवाढ त्याच प्रमाणात झाली नाही. आर्थिक धोरणांनी भांडवलाला प्राधान्य दिले, श्रमाला नाही. कर धोरण हे याचे ठळक उदाहरण आहे. कॉर्पोरेट कर कपात करण्यात आली, पण अप्रत्यक्ष करांचा बोजा सामान्य नागरिकांवर टाकण्यात आला. इतिहासात पहिल्यांदाच वैयक्तिक आयकरातून मिळणारे उत्पन्न कॉर्पोरेट करांपेक्षा जास्त झाले आहे, ही कररचनेतील गंभीर विषमता आहे.

### कल्याणकारी योजनांच्या निधीतील कपात

ग्रामीण रोजगार हमी, सामाजिक सुरक्षा, पेन्शन योजना अशा सर्व कल्याणकारी योजनांवरील खर्च घटला आहे. आर्थिक संकटाच्या काळात सरकार सुरक्षाजाळे मजबूत करते; येथे उलटे चित्र दिसते. आरोग्य आणि शिक्षणावरील सार्वजनिक खर्च जागतिक निकषांच्या तुलनेत अत्यल्प आहे. आरोग्य सेवा महाग होत आहे; गंभीर आजार म्हणजे कुटुंबासाठी आर्थिक आपत्ती. शिक्षण क्षेत्र व्यापारीकरणाच्या दिशेने ढकलले गेले आहे. फी वाढ, कर्जाधारित शिक्षण आणि परीक्षा व्यवस्थेतील गोंधळ तरुणांच्या भविष्यासाठी घातक आहे.

### ग्रामीण संकट आणि शहरी ताण

शेती अजूनही मोठ्या लोकसंख्येला आधार देते, पण शेतकरी सुरक्षित नाहीत. कमी उत्पन्न, कर्जबाजारीपणा आणि हवामान बदलामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था अस्थिर आहे. ग्रामीण संकट शहरांकडे स्थलांतर वाढवते, ज्यामुळे शहरी असंघटित रोजगार आणि सामाजिक ताण वाढतो.

### वाढते कॉर्पोरेट एकाधिकार

दूरसंचार, विमान वाहतूक, डिजिटल पेमेंट्स, बंदरे अशा अनेक क्षेत्रांत काही कंपन्यांचे वर्चस्व वाढताना दिसते. स्पर्धा कमी झाली की ग्राहकांचे नुकसान होते. इंडिगो एअरलाइन्सच्या अलीकडील संकटाने देशातील विमान वाहतूक कशी ठप्प होऊ शकते हे दाखवून दिले. बाजार संतुलित ठेवण्यासाठी मजबूत स्पर्धा धोरण अपरिहार्य आहे; अन्यथा आर्थिक शक्ती राजकीय प्रभावात रूपांतरित होते.

### आर्थिक अव्यवस्थापनाचे संकेत

खासगी गुंतवणूक अपेक्षित वेगाने वाढलेली नाही. विदेशी गुंतवणूक अस्थिर आहे. रुपयाची घसरण आयात महाग करते आणि अर्थव्यवस्थेचा कमकुवत पाया उघड करते. सरकारी कर्ज वाढत असताना नागरिकांना दर्जेदार पायाभूत सुविधा जाणवत नाहीत. रस्ते, रेल्वे, शहरी नियोजन, दैनंदिन जीवनात सुधारणा दिसत नाही. कर्ज वाढूनही जीवनमान सुधारत नसेल, तर आर्थिक व्यवस्थापनावर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. अधिकृत आकडे आणि नागरिकांच्या अनुभवातील दरी ही सर्वात चिंताजनक बाब आहे. आर्थिक विश्वासार्हता केवळ आकड्यांवर टिकत नाही; ती लोकांच्या जीवनातल्या बदलांवर टिकते. विकासाचा अनुभव नागरिकांना जाणवत नसेल, तर विकासाचा दावा पोकळ ठरतो.

### पुढचा मार्ग

आरोग्यदायी अर्थव्यवस्थेचा पाया संतुलनात असतो. वाढीसोबत समानता, गुंतवणुकीसोबत रोजगार आणि कार्यक्षमतेसोबत सर्वसमावेशकता आवश्यक असते. सध्याची रचना मात्र मोजक्या लोकांसाठी संपत्ती निर्माण करते, तर बहुसंख्य जनतेसाठी असुरक्षितता वाढवते. विषमतेवर उभी राहिलेली अर्थव्यवस्था दीर्घकाळ टिकत नाही; ती शेवटी सामाजिक तणाव आणि अस्थिरतेला जन्म देते.

सुधारणा पारदर्शकतेपासून सुरू व्हायला हव्यात. रोजगारप्रधान क्षेत्रांना प्राधान्य, आरोग्य व शिक्षणातील सार्वजनिक गुंतवणूक, संतुलित कररचना, स्पर्धा संरक्षण आणि मजबूत सामाजिक सुरक्षा यांशिवाय समावेशक विकास शक्य नाही.

वाढ ही अंतिम कसोटी नाही. खरी कसोटी म्हणजे ती वाढ लोकांच्या आयुष्यात स्थैर्य, सन्मान आणि संधी निर्माण करते का? भारत आज निर्णायक वळणावर उभा आहे. काहींच्या समृद्धीकडे जाणारा मार्ग की सर्वांसाठी न्याय्य विकासाचा मार्ग ही निवड करणे आता अपरिहार्य आहे.

विषमता वाढली की अर्थव्यवस्था कमकुवत होते आणि कमकुवत अर्थव्यवस्था शेवटी समाजालाच महागात पडते. विकासाचा लाभ सर्वांना मिळणार की तो मोजक्यांच्याच हातात राहणार, हा प्रश्नच भारताच्या भविष्यासाठी निर्णायक आहे. या प्रश्नाचे उत्तरच देशाची पुढील आर्थिक दिशा ठरवेल.

# क्रांतीच्या कळा

**'भारतातील तरुण पिढी डिजिटल व्यसनांच्या विळख्यात सापडली आहे,' हा देशाच्या आर्थिक पाहणी अहवालात काढण्यात आलेला निष्कर्ष सर्वस्वी नवा किंवा धक्कादायक मुळीच नाही; मात्र वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाच्या पलीकडे जाऊन या पिढीची उत्पादकता आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणारे त्याचे परिणाम मात्र चिंता करावी, असेच आहेत. या पाहणी अहवालामध्ये डिजिटल व्यसनाधीनता या विषयावर प्रथमच स्वतंत्र अध्याय सादर करावासा वाटावा, त्यावरून या मुद्द्याचे गांभीर्य लक्षात येते.**

डिजिटल साधनांचा अतिरेकी वापर आणि त्यातून उद्भवणाऱ्या शारीरिक-मानसिक व्याधी यांवर अनेक अभ्यास आजवर करण्यात आले. मात्र, भविष्यात या व्यसनाधीनतेचे साऱ्या देशावर काय परिणाम होतील आणि धोरणकर्त्यांनी कोणती पावले उचलावीत, याबाबत अहवालात विशेषतः भारतीय संदर्भाने मांडलेला सर्वांगीण दृष्टिकोन नक्कीच अंतर्मुख करणारा आहे. बदलत्या जगात सामोरे येणारे डिजिटल युग, ही एक प्रकारे अपरिहार्यता बनत असतानाच, या साधनांच्या अतिरेकी आणि अविवेकी वापराचे 'साइड इफेक्ट' किती धोकादायक आहेत, याकडे देशाच्या आर्थिक सल्लागारांनी सप्रमाण लक्ष वेधले आहे आणि त्यावरील संभाव्य उपाययोजनांबाबतही चर्चा केली आहे. या शतकाच्या सुरुवातीला भारतात डिजिटल क्रांतीच्या पाऊलखुणा उमटू लागल्या. विशेषतः करोना साथीनंतर 'ऑनलाइन' हा अनेक दैनंदिन व्यवहारांमध्ये परवलीचा शब्द झाला. विशेषतः डिजिटल आर्थिक व्यवहारांमध्ये झालेल्या विस्ताराचे जगभरात कौतुकही होते. गेल्या वर्षी डिजिटल अर्थव्यवस्थेचा 'जीडीपी'मध्ये सुमारे १४ टक्क्यांचा वाटा होता. देशातील इंटरनेट जोडण्यांची संख्या ९७ कोटींवर पोहोचली असून, ८५ टक्के कुटुंबांमध्ये किमान एक 'स्मार्टफोन' आहे. इंटरनेटचा निम्म्याहून अधिक वापर हा व्हिडीओ पाहण्यासाठी, ४३ टक्के नागरिक समाजमाध्यमांवर आहेत. ४० टक्के नागरिक ई-मेलचा वापर करतात, तर २६ टक्के नागरिक डिजिटल पेमेंट करतात. त्याबरोबरच ३५ कोटी नागरिक समाजमाध्यमांवर असून, ४० कोटी 'ओव्हर द टॉप'चे (ओटीटी) वापरकर्ते आहेत. वाढत्या 'स्क्रीन टाइम'मुळे निद्रानाश, एकाग्रता-आत्मविश्वासाचा, अकारण चिंता-नैराश्य आणि ताणातून होणाऱ्या आत्महत्या; तसेच बैठ्या जीवनशैलीमुळे जडणाऱ्या शारीरिक व्याधी यांना अनेक जण तोंड देत आहेत. मात्र, या सर्वांचा विद्यार्थी व तरुण पिढीच्या कार्यक्षमतेवर होणारा विपरीत परिणाम साऱ्या देशासाठी घातक आहे. यातून आरोग्यसेवेवर होणारा खर्च आणि ऑनलाइन फसवणूक चिंताजनक आहे. तरुण लोकसंख्येचा लाभ (डेमोग्राफिक डिव्हिडंड) मिळवण्याच्या काळातच देशाची सर्वात मोठी संपत्ती असलेल्या तरुण मनुष्यबळाची उत्पादकता घटणे खचितच परवडणारे नाही. याबाबत सायबर सुरक्षा शिक्षण, विद्यार्थी-पालक प्रशिक्षण, स्क्रीन टाइम व्यवस्थापन असे काही उपाय आर्थिक सल्लागारांनी सुचवले आहेत. जवळपास प्रत्येक देशातल्या पालकांना हीच चिंता सतावते आहे. त्यामुळेच ऑस्ट्रेलियासारख्या देशांनी १६ वर्षांपर्यंतच्या मुलांना समाजमाध्यमांच्या वापरावर घातलेल्या बंदीचे काय परिणाम होतात, याकडे सगळ्यांचे लक्ष आहे. आपल्याकडेही आंध्र प्रदेश-गोव्यात लहान मुलांना अशी बंदी घालण्यासंदर्भात मंत्रिगट अभ्यास करीत आहेत; तसेच डिजिटल वापराची अपरिहार्यता असलेल्या माहिती तंत्रज्ञान कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांनाही काहीशी मोकळीक मिळावी, या उद्देशाने 'डिजिटल डिटॉक्स'चे खासगी विधेयक संसदेत सादर झाले आहे. याबाबत सध्याचे कायदे, राज्य सरकारांना असलेले अधिकार आणि परिणामकारक अंमलबजावणीतील मर्यादा, अशी व्यापक चर्चा होणे आवश्यक आहे.

# मराठी शाळा व संस्कृती वाचवणार कोण?




**मराठी शाळा टिकण्यासाठी आता हवी फक्त पालकांची इच्छाशक्ती व मानसिकतेत होणारा बदल आता मराठी शाळा टिकवू शकतात असं आयुक्तांनी स्पष्ट केलं आहे.**

काही वर्षांपूर्वीची गोष्ट, मुंबईतील मराठमोळ्या ग्रँट रोड परिसरात राहणारे माझे मित्र किस्सा सांगत होते. मराठी भाषेचा अभिमान म्हणून त्यांनी त्यांच्या मुलीला ग्रँट रोड येथील एका नामांकित मराठी शाळेत प्रवेश घेतला. काही वर्षे गेल्यानंतर अचानक एक दिवस त्या शाळा व्यवस्थापनाने मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला व तसे पालकांना कळवले. माझे मित्र धडाडीचे कार्यकर्ते होते. ग्रँट रोड सारख्या मराठमोळ्या विभागातील नामांकित मराठी शाळा बंद पडते म्हणून त्यांनी थेट तेथील कार्यकर्त्यांना हाताशी धरले व शाळा व्यवस्थापनाला जाब विचारण्यासाठी शाळेत पोहोचले. प्रथम वादावादी झाल्यानंतर शाळा व्यवस्थापनाने नमती भूमिका घेतली व सुचवले की आम्ही मराठी शाळा सुरू ठेवण्यास तयार आहोत,फक्त तुमची जबाबदारी विद्यार्थी आणून देण्याची राहील, ते झाले तरच आम्ही शाळा सुरू करू शकतो, हे सांगताच सर्वच विषयावर पडदा टाकावा लागला. कारण त्यावर ना पालकांकडे उत्तर होते ना शाळा व्यवस्थापकांकडे. या सवालां जबाबदार होती ती पालकांची द्विधा मानसिकता. असो. विषय असा, की मराठी शाळा असो किंवा मराठी संस्कृती असो ती टिकवायची कोणी त्याचे खापर प्रशासनावर फोडायचे, की त्याची सर्वस्वी जबाबदारी आपण जनतेने घ्यावी का? याला नेमके जबाबदार कोण? घरात मराठी हवी मात्र बाहेर पडल्यावर हिंदी अथवा इंग्रजीतच बोलावे ही सध्याची मानसिकता. मग आपण प्रशासनाकडे का बोट दाखवायचे. त्यातही आपल्या आजूबाजूला मराठीसाठी व मराठी संस्कृती टिकण्यासाठी झटणारे बरेच असतात त्यातलंच एक मराठी अभ्यास केंद्र. आजच विषय का काढावा लागला कारण मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष दीपक पवार, अभिनेत्री आणि मराठी शाळांच्या सदिच्छादूत चिन्मयी सुमीत हे मराठी अभ्यास केंद्राचे कार्यकर्ते. यांनी नुकतीच पालिका आयुक्तांची भेट घेतली. कारण होते मराठी शाळा बंद पडण्याच्या विषयावर मुंबई महापालिका आयुक्तांची भूमिका काय? विषयाला चांगली सुरुवात झाली असताना मात्र आयुक्तांनी घुमजाव केले असा या मराठी अभ्यास केंद्राचा आरोप आहे. पालिकेच्या सहा शाळांचा खासगीकरणाचा मुद्दा यावेळी मांडण्यात आला. त्यात पालिकेच्या शाळा फक्त सीबीएससी व आयसीएससी का? यामुळे प्रादेशिक माध्यमांच्या शाळा बंद पडतील असा धोकाही व्यक्त करण्यात आला. यावर पालिका आयुक्त गगराणी यांच्या मते या सहा शाळांचा विषय म्हणजे शाळांचे खासगीकरण नाही तर भूखंडाचे खासगीकरण आहे. या चुकीच्या बातम्या असल्याचा त्यांनी उल्लेख केला. त्याबाबतचे सादरीकरण त्यांच्या माध्यमातून केले गेले. पालिकेकडे पडलेले भूखंड चटईक्षेत्र निर्देशानुसार बदल्यात जे उपलब्ध होतात तो हा विषय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आपण मराठी शाळांचा आग्रह धरू नये का? असा प्रश्न विचारला तेव्हा गगराणी यांनी हा आग्रह आम्हाला धरायचा नाही असे स्पष्ट म्हटले व हा धोरणात्मक निर्णय असल्याचे सांगितले.

गगराणी यांनी मुंबईतील कुठलीही इमारत जीर्ण व धोकादायक झाली असल्यास त्याच काय करायचं हे महापालिकेचे धोरण आहे असे म्हटले. परंतु, शाळांची इमारत वर्षानुवर्षे पूर्ण होत नाही ही वस्तुस्तिथी आयुक्तांना पटली. पाडकाम करणाऱ्या शाळांच्या बाबतीत पालकांना विश्वासात घेतले जात नाही अशी भूमिका मांडली गेली असता गगराणी यांनी ही भूमिका बरोबर असल्याचे मान्य करत पालकांसोबत चर्चा करण्याचे निर्देश दिले. सगळी मुलं विस्थापित झाल्यानंतर महापालिकेने कारवाई करायला सुरुवात केली. दीड वर्षे मुलांची फरपट झाली ही भूमिका स्पष्टपणे मांडली. गगराणी यांनी समन्वयाचा अभाव असल्याबाबत मान्य केले. यानंतर समन्वयाचा अभाव राहणार नाही त्याबाबत काळजी घेण्याच्या सूचना दिल्या.


मुंबई पब्लिक स्कूलचा जो प्रयोग मुंबई महानगरपालिका करत आहे तो थांबवण्याबाबत महानगरपालिकेने पुढाकार घ्यायला हवा. सीबीएससी किंवा इतर मंडळाच्या ज्या शाळा आहेत त्या मराठी माध्यमाच्या सुरू करण्याबाबत याबाबत भूमिका मांडली व त्या काढण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने पुढाकार घ्यावा याबाबत चर्चा झाली. मराठी भाषा संवर्धन समिती स्थापन करण्याबाबत भूमिका मांडली गेली. अंगणवाड्यांसोबत जोडून घेऊन मराठी अभ्यास केंद्राला काम करता येईल का, याबाबत विचारणा करण्यात आली व प्रस्ताव ठेवण्यात आला. मुंबई महानगरपालिका मराठीसाठी जे काही काम करते त्याचे सादरीकरण करण्यात आले. त्यांचं असं म्हणणं होतं की मुंबई महानगरपालिका मराठी शाळांसाठी काहीच करत नाही, असं जे चित्र उभं केलं आहे ते चुकीचं आहे. पालिका मराठीसाठी काय काय करतं याची जंत्रीच पालिका आयुक्तांनी मांडली. तर मुंबई महानगरपालिका परिपत्रक आदेश मराठी काढतात, विविध दिन साजरे करतात, विविध प्रकाशने काढतात, मराठीचा वापर, अभिनय स्पर्धा घेतात, साहित्य संमेलनाला मदत करतात, कर्मचाऱ्यांच्या विविध परीक्षा घेतात, प्रत्येक खात्यात मराठी भाषा अधिकारी नियुक्त केला आहे, पुस्तके विक्री करतात, नाट्यगृहामध्ये मराठी नाटकांना ५० टक्के सूट देतात, कर्मचाऱ्यांसाठी अभिनय स्पर्धा राबवतात गगराणी यांनी खासगी संस्थांच्या शाळा सुद्धा बंद पडत आहेत असं म्हटलं आहे. त्यांनाही तुम्ही विचारलं पाहिजे असं सुचवलं. मराठी शाळा का बंद पडत आहे.

हा सामाजिक प्रश्न आहे, असं त्यांचं म्हणणं होतं. फक्त आमच्या शाळेची संख्या कमी होत आहे असे नाही, तर इतर खासगी शाळा सुद्धा बंद पडत आहेत. गुणवत्ता वाढीसाठी केलेल्या प्रयत्नांमुळे मार्च २०२५ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत महानगरपालिकेच्या मराठी शाळांचा ९५ टक्के इतका निकाल लागला. महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीत ९७ टक्के इतके गुण पटकावले आहेत. यासोबतच गुणवत्ता वाढ, सराव परीक्षा असे उपक्रम राबविण्यात येतात. महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांकडून कोणत्याही स्वरूपाचे फी घेतली जात नाही. विद्यार्थ्यांना २७ प्रकारच्या शैक्षणिक वस्तूंचे मोफत वाटप केले जाते. महानगरपालिकेचा विद्यार्थी खासगी शाळेपेक्षाही अधिक गुणसंपन्न आणि त्याच्याकडे विविध शैक्षणिक सुविधा असाव्यात, यासाठी महानगरपालिका प्रयत्न करते. पालिकेने फाऊंडेशनल लिटरसी व न्यूमरसी निपूण भारतअंतर्गत महानगरपालिकेने केलेल्या प्रयत्नांमुळे तिसऱ्या इयत्तेतील प्रत्येक माध्यमाचा विद्यार्थी उत्तम प्रकारे वाचू शकतो. तसेच, त्या-त्या स्तरावरील गणिताचे ज्ञानही त्याला उत्तमरीत्या अवगत होत आहे. यासाठी महानगरपालिकेने विशेष प्रयत्न केले असून याच चांगले परिणाम दिसून येत आहे. मुंबईतील मराठी शाळा आणि शिक्षण हा सामजिक आणि शैक्षणिक मुद्दा आहे. पालिका प्रशासनाकडून कोणत्याही माध्यमांच्या शाळांचे खासगीकरण करण्यात आले नाही, असा दावा केला. तरीही मुंबई उपनगरातील मराठी शाळा बंद पडत आहेत ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. मराठी शाळा टिकण्यासाठी आता हवी फक्त पालकांची इच्छाशक्ती व मानसिकतेत होणारा बदल आता मराठी शाळा टिकवू शकतात अन्यथा आज पालिका आयुक्तांनी मराठी शाळेबाबत व सर्वस्वी मराठीबाबत आपले भूमिका मांडली. येणाऱ्या काळात ती मांडण्याची संधी मुंबईकरांना मिळणार नाही हे निश्चित.

# तवा राईस

**सामग्री :** २ वाटी शिजवलेला भात, २ अख्ख्या लाल मिरच्या, १ चमचा आले-लसूण पेस्ट, फोडणीसाठी तेल, बारीक चिरलेला एक कांदा, गाजर, टोमॅटो (इच्छेप्रमाणे), अर्धा वाटी मटार, १/२ चमचा पाव भाजी मसाला, १/४ चमचा हळद पावडर, १/२ चमचा तिखट, मीठ स्वादानुसार.

**कृती :** सर्वात आधी गाजर आणि मटार उकडून घ्यावे जेणेकरून नरम होतील. एक मोठ्या पॅनमध्ये तेल गरम करून त्यात जिरं, अख्ख्या लाल मिरच्या आणि पाव भाजी मसाला टाका. नंतर कांदा, आले-लसूण पेस्ट टाकून मिक्स करा. नंतर टोमॅटो टाकून हलवून घ्या. शिजल्यासारखं वाटल्यावर त्यात मटार आणि गाजर टाका. नंतर हळद, तिखट, गरम मसाला, मीठ टाका. आता भात टाकून हलक्या हाताने हलवून घ्या. वरून कोथिंबीर, लिंबाने सजवून घ्या. दह्यासोबत सर्व्ह करा.



# केमिकल पिलिंग केल्यानंतर कशी घ्याल चेहऱ्याची काळजी ?



चेहऱ्यावरील काळे डाग कमी करण्यासाठी, चेहरा उजळवा याकरिता केमिकल पिल्स फायदेशीर ठरतात. केमिकल पिल्समुळे त्वचेवरील निस्तेज आणि मृत स्तर काढायला मदत होते. त्यामुळे त्वचा अधिक तजेलदार होते. चेहऱ्यावर लावले जाणारे केमिकल त्वचेतील टिश्यूंचे नुकसान टाळण्यास मदत करतात. केमिकल पिलमध्ये ॲसिड, फळांचा, बोटॅनिकल एक्स्ट्रॅक्ट किंवा दुधाचा समावेश असतो. त्वचेच्या पोतनुसार आणि समस्येनुसार कोणते पिल वापरावे याचा निर्णय डॉक्टर घेतात. केवळ केमिकल पिल लावून तुम्हाला अपेक्षित निकाल मिळत नाहीत, तर त्यानंतरही त्वचेची काळजी घेणं आवश्यक आहे. यासाठी प्रसिद्ध सेलिब्रिटी डरमॅटोलॉजिस्ट डॉ. जयश्री शरद यांनी दिलेला हा खास सल्ला नक्की जाणून घ्या.



▮ पिल लावल्यानंतर लगेचच आईस कॉम्प्रेसेस चेहऱ्यावर फिरवावे. किमान १०-१५ मिनिटे आईस कॉम्प्रेस चेहऱ्यावर ठेवा.

▮ केमिकल पिलनंतर किमान १० दिवस चेहऱ्याला स्क्रब किंवा गरम पाणी लागणार नाही याची काळजी घ्या. या दिवसांत चेहऱ्याला स्क्रब आणि गरम पाणी वापरू नका.

▮ सौम्य, न्यूट्रल pH फेशिअल क्लिंजरचा वापर करा. चेहरा स्वच्छ करण्यासाठी sebamed olive wash dla वा Cetaphil cleansing lotion चा वापर करावा.

▮ केमिकल पिल ट्रीटमेंट केल्यानंतर लगेचच तसेच सनस्क्रीन न लावता बाहेर पडू नका. उन्हात फिरत असल्यास किमान दोन-दोन तासांनी सतत सनस्क्रीन लावा.

▮ केमिकल पिल ट्रीटमेंटनंतर दोन दिवसांनी चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावायला सुरुवात करा.

▮ केमिकल पिलनंतर काही तासांतच त्वचेवरून एक पातळ स्तर निघायला सुरुवात होते. तो स्तर काढण्यासाठी सतत चेहऱ्याला हात लावू नका किंवा त्वचा खेचू नका.

▮ स्कीन पिलिंग होताना ब्लिचिंग किंवा केस काढण्यासाठी थ्रेडिंग, वॅक्सिंग करणे टाळा.

▮ पिलिंग होताना ॲण्टी अॅक्ने क्रीमचा वापर करू नका. तसेच स्कीन लाईटिंग क्रीम वापरणे टाळा.

# वारंवार तोंड येत असल्यास आजमावा हे उपाय

**पचनक्रिया** व्यवस्थित नसेल, किंवा शरीरामध्ये काही कारणाने उष्णता वाढली असेल, तर वारंवार तोंड येऊ लागते. यालाच 'माऊथ अल्सर्स' असेही म्हटले जाते. अनेकदा काही कारणासाठी घेतलेली औषधे उष्ण पडल्यानेही तोंड येऊ शकते. तोंड आले असता काही खाणे-पिणे कठीण होऊन बसते. जिभेवर बारीक फोड येतात आणि क्वचित वेदनाही होतात. बहुतेक वेळी बी कॉम्प्लेक्स घेतल्याने माऊथ अल्सर्स थोड्याच अवधीत बरे होतात. त्याच्या जोडीने काही घरगुती उपायांचा अवलंब करूनही हे माऊथ अल्सर्स बरे करता येऊ शकतात.

तुळस स्वास्थ्यवर्धक असून, यामध्ये वेदनाशमक गुण आहेत. तसेच शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी तुळस सहाय्यक आहे. तोंड आले असता दिवसातून तीन ते चार वेळा तुळशीची पाने चावून खाल्ल्याने आराम मिळतो. जर पचनक्रिया सुरळीत नसल्याने शरीरातील उष्णता वाढून तोंड आले असेल, तर ते बरे करण्यासाठी खसखस उपयुक्त ठरते. थोडी खसखस चावून खाल्ल्याने शरीरातील उष्णता कमी होऊन तोंडातील अल्सर्स लवकर निवळतात.

नारळाचे तेल आणि नारळाचे पाणी हे दोन्ही तोंडातील अल्सर ठीक करण्यासाठी अतिशय गुणकारी आहेत. नारळाच्या पाण्याने शरीरातील उष्णता दूर होत असून, नारळाचे तेल तोंडात धरून चूळ भरल्याप्रमाणे खुळखुळविल्यानेही तोंडातील अल्सर ठीक होण्यास मदत होते. याला 'ऑईल पुलिंग' म्हटले जाते. जिथे अल्सर आहेत त्यावरून नारळाचा चव लावल्यानेही तोंडातील अल्सर बरे होतात. त्याचप्रमाणे ज्येष्ठ मधाच्या पुडीमध्ये थोडासा मध घालून तोंडामध्ये आणि जिभेवर लावल्यास अल्सर ठीक होतात.



# फुफ्फुसाचा कर्करोग टाळण्यासाठी योग उपयुक्त



**फुफ्फुसाचा** कर्करोग हा जगामध्ये सर्वात जास्त आढळणाऱ्या कर्करोगांपैकी एक आहे. केवळ २०१८ या एकाच वर्षामध्ये जगभरामध्ये २,०९३,००० रुग्णांना फुफ्फुसाचा कर्करोग असल्याचे निश्चित निदान केले गेले. वास्तविक हा रोग महिलांच्या मानाने पुरुषांमध्ये अधिक आढळून येत असे. पण सध्याच्या काळामध्ये वाढते प्रदूषण, बदललेल्या जीवनशैली यामुळे हा रोग आता महिलांमध्येही आढळून येऊ लागला आहे. फुफ्फुसाच्या कर्करोगाचे चार प्रकार असून, यामध्ये 'अडेनोकार्सीनोमा' आणि 'स्क्वामस सेल कार्सीनोमा' हे दोन प्रकार जास्त आढळून येणारे आहेत. सध्याच्या प्रगत काळामध्ये फुफ्फुसाचा कर्करोग योग्य उपचार करून बरा होण्यासारखा असला, तरी मुळात या कर्करोगाचे निदान वेळेवर होणे अत्यावश्यक असते. या रोगाची अनेक लक्षणे असून, दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ सतत खोकला येणे, हात आणि बगलांमध्ये वेदना, मान आणि पाठदुखी, दम लागणे, अचानक वजन जलद घटू लागणे, थुंकीतून रक्त पडणे आणि सतत सुस्ती जाणवणे ही या रोगाची काही प्रमुख लक्षणे आहेत. या रोगावर निश्चित उपचार शोधीत असतानाच, सामन्य 'अॅलोपथीक' उपचार पद्धतीच्या जोडीने वैद्यकीय तज्ज्ञ इतर उपचार पद्धतींकडेही पाहत आहेत. या पद्धतींमध्येच योगसाधना फुफ्फुसाच्या कर्करोगावर अतिशय प्रभावी उपाय असल्याचे दिसून आले आहे. या संबंधी रिसर्च अमेरिकेमध्ये सुरू असून, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ येथील २६ रुग्णांवर केमोथेरपी आणि इतर उपचारांच्या सोबतच योगसाधनेद्वारेही यशस्वी उपचार करण्यात येत आहेत. या सर्व रुग्णांवर योगसाधनेचा प्रभाव इतका चांगला झाला, की कर्करोगातून पूर्ण बरे होण्यानंतरही आता यातील अनेक रुग्णांनी योगसाधनेचा अवलंब त्यांच्या जीवनशैलीमध्ये कायमस्वरूपी केला असल्याचे समजते. योगसाधनेमुळे शरीर तणावरहित होत असून, जे रुग्ण केमोथेरपी किंवा रेडिएशन थेरपीसारखे उपचार घेत होते, त्यांच्यासाठी योगसाधना विशेष फायद्याची ठरली आहे. तसेच या रुग्णांचा वैयक्तिक शारीरिक क्षमता आणि आवश्यकता लक्षात घेऊन त्यानुसार योगासने त्यांना शिकविली गेल्याने त्याचा या रुग्णांना विशेष लाभ झाल्याचे पहावयास मिळत आहे.

# व्यवस्थित काम करत असलेला स्मार्टफोन तुमच्या 'या' सवयींमुळे होतो खराब

अनेक वेळा स्मार्टफोन योग्य काळजी न घेतल्यामुळे देखील अचानक खराब होतो आणि फोनवर केलेला खर्च व्यर्थ झाल्यासारखा वाटतो. पण, स्मार्टफोन नीट हाताळला आणि वापरताना काही गोष्टींची विशेष काळजी घेतली तर फोन खराब झाल्यामुळे होणारे नुकसान टाळता येऊ शकते. तुम्हीही या चुका करत असाल तर लगेच या सवयी बदला, अन्यथा तुमचा स्मार्टफोन कायमचा खराब होऊ शकतो. पाहा या काही सोप्या टिप्स.

**चार्ज करताना लक्ष ठेवा**

स्मार्टफोन चार्ज करताना खूप काळजी घ्यावी लागते. अनेकदा युजर्स फोन चार्जवर ठेवतात आणि त्याबद्दल विसरून जातात. यामुळे स्मार्टफोनचा मदरबोर्डही खराब होऊ शकतो. फोनचा मदरबोर्ड खराब झाल्यास तुम्हाला खूप त्रास सहन करावा लागेल. यामुळे फोन कायमचा डेड होऊ शकतो. फोन एकदा खराब झाल्यास, त्यानंतर तुम्हाला नवीनच फोन घ्यावा लागेल. कारण फोनच्या मदर बोर्डची किंमत खूप जास्त आहे.



**पाण्यापासून दूर ठेवा**

पावसाळ्यात अनेकदा स्मार्टफोन खराब होतात. कारण, ते मदर बोर्डमध्ये हलका ओलावा आणतात. अशा परिस्थितीत फोनचा मदरबोर्ड कायमचा डेड होऊ शकतो. काही वेळा फोन पाण्याजवळ ठेवल्यास देखील मदर बोर्डमध्ये ओलावा येतो. मदर बोर्डमध्ये ओलावा असल्यास, फोन कायमचा डेड होऊ शकतो. फोनचा मदर बोर्ड खराब झाला असेल तर त्यानंतर फोनचा काहीही उपयोग होणार नाही.

**वारंवार चार्जिंग करणेसुद्धा नाही सुरक्षित**

स्मार्टफोनचे वारंवार चार्जिंग करणे देखील टाळावे. जर तुम्ही स्मार्टफोनला वारंवार चार्ज करत असाल तर फोनच्या प्रोसेसरवर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये यामुळे स्मार्टफोन कायमचा खराब होऊ शकतो. तसेच त्याचा सर्वात मोठा तोटा म्हणजे फोनची बॅटरी कायमची डेड होऊ शकते. अशा परिस्थितीत तुम्हाला फोनची बॅटरी आणि मदर बोर्ड दोन्ही बदलावे लागू शकतात. म्हणजेच चांगली मोठी रक्कम स्मार्टफोन रिपेयरसाठी खर्च करावी लागू शकते.

# चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काही सोपे उपाय

ताजेतवाने दिसण्यासाठी चेहरा स्वच्छ ठेवण्याची गरज असते. पण चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काय, किती आणि कसं वापरायला पाहिजे हे माहिती असणंही गरजेचं आहे. पाहू चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काही सोपे उपाय...



**फेसवॉश :** चेहरा स्वच्छ आणि टवटवीत ठेवण्यासाठी फेसवॉश गरजेचं आहे, पण त्वचेच्या प्रकृतीनुरूप योग्य फेसवॉश वापरला पाहिजे. हर्बल फेसवॉश सर्वात उत्तम. तरीही दिवसातून फक्त दोन वेळा फेसवॉश वापरा. जर आपण मेकअप करत नसाल तर रात्री झोपण्यापूर्वी फक्त पाण्यानेही चेहरा धुवू शकता. ▮ऑइली स्किनसाठी नीम, कोरफड, आणि मिंट फेसवाश योग्य विकल्प आहे. ▮ड्राय स्किनसाठी केसर, मिल्क आणि हनी फेसवॉश वापरू शकता. ▮डेड स्किनसाठी स्क्रब फेसवाश वापरणे योग्य ठरेल.

**कोमट पाणी :** फेसवॉशने चेहरा धुताना पाणी जास्त गरम नसलं पाहिजे याने स्किन खराब होते. त्वचेसाठी जास्त गार पाणीही योग्य नाही म्हणून ताज्या किंवा कोमट पाण्याने चेहरा धुवायला हवा.

**घासू नका :** चेहरा जास्त घासण्याने रंग गोरा दिसेल हा विचार चुकीचा आहे. असे करणे हानीकारक ठरू शकतं. कारण अशाने त्वचेवरील नरम परत उतरते आणि स्किन कोरडी पडते. तसेच ज्यांना फेस वाइप्स वापरण्याची सवय असते त्यांनीही दिवसातून दोनपेक्षा जास्त वेळा याचा वापर करू नये.

**मेकअप काढा :** मेकअप काढणे अत्यंत आवश्यक आहे. मेकअप काढल्याने त्वचासुद्धा मोकळा श्वास घेऊ शकते.

# डोळ्यांच्याभोवती काळी वर्तुळे असण्यामागे असू शकतात ही कारणे



अनेकदा शारीरिक विश्रांती जर पुरेशी मिळत नसली, तर डोळ्यांभोवती काळी वर्तुळे दिसून येतात. मात्र केवळ शारीरिक थकवा आल्यानेच डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे येतात असे नाही, तर यासाठी इतरही अनेक कारणे असू शकतात. काहींच्या डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे 'पिग्मेंटेशन' मुळे असू शकतात. हे पिग्मेंटेशन काहींच्या बाबतीत अनुवांशिक असू शकते. दक्षिण आशियाई लोकांमध्ये अशा प्रकारचे पिग्मेंटेशन दिसून येते. पिग्मेंटेशनमुळे जर डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे असतील, तर कितीही उपाय-उपचार केले तरी ही वर्तुळे हलकी होतात, पण नाहीशी होत नाहीत.

ज्या व्यक्तींना चेहऱ्यावरील त्वचेवर सोरायसिस किंवा एक्झिमा सारखे त्वचा विकार असतील, त्यांच्याही डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे दिसून येऊ शकतात. या दोन्ही विकारांमध्ये त्वचा लालसर, किंवा गडद रंगाची दिसू लागते. तसेच सतत खाज सुटत असल्याने ही त्वचा आणखीनच काळसर दिसू लागते. त्यामुळे जर डोळ्यांच्या आसपासच्या त्वचेवर एक्झिमा किंवा सोरायसिस असले, तर त्यामुळे डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे असल्याप्रमाणे भासतात.



ज्या व्यक्तींना सतत डोळे चोळण्याची सवय असते, त्यांच्या डोळ्याच्या आसपासची त्वचा वारंवार चोळली गेल्यामुळे काळसर आणि काहीशी जाडसर दिसू लागते. वारंवार डोळे चोळल्याने डोळ्यांच्या आसपासची त्वचा रगडली जाते. त्यामुळे त्वचेच्या खाली असलेल्या रक्तपेशींना नुकसान पोहोचते आणि त्यामुळे त्वचा काळसर दिसू लागते.

अनेकदा डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे एखाद्या ॲलर्जीमुळेही असू शकतात. या वर्तुळांच्या जोडीनेच डोळ्यांच्या आसपास हलकी सूजही दिसून येते. त्यामुळे याचे निदान डॉक्टरांकडून करून घेऊन योग्य औषधोपचार आणि भरपूर विश्रांतीनंतर ही काळी वर्तुळे नाहीशी होतात.

शरीरामध्ये पाण्याची कमतरता झाल्यास, म्हणजेच डीहायड्रेशन झाल्यासही डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे दिसून येतात. एखाद्या आजारपणामुळे किंवा अतिरिक्त मद्यपानामुळे शरीरातील इलेक्ट्रोलाईट्स कमी होऊ लागतात, त्यामुळे डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे उद्भवतात. अशा वेळी पाण्याचे प्रमाण वाढवल्याने कालांतराने ही समस्या दूर होऊ शकते.

पुदिन्याच्या पानांमुळे अनेक रोग दूर होतात. पुदिना चटणी जर समोशाबरोबर सेवन केली तर त्यामुळे चवच वाढते असे नव्हे तर पचनही चांगले होते. पुदिना वनस्पतीमुळे पोटात शांत वाटते व आग होत नाही.

# पुदिना सर्दी, अन्नपचनावर उपयुक्त

**पुदिन्याची** पाने अन्नपचन, मुख आरोग्य, सर्दी यावर गुणकारी असल्याचा दावा तज्ज्ञांनी केला आहे. डाबर रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंटचे प्रमुख जेएलएन शास्त्री व सर गंगाराम रुग्णालयाचे वरिष्ठ आयुर्वेद सल्लागार परमेश्वर अरोरा यांनी संशोधनाअंती पुदिन्याचे अनेक उपयोग सांगितले आहेत. त्यानुसार पुदिन्यात ॲंटीऑक्सिडंट व फायटोन्यूट्रिअंट असतात त्यातून पोटातील स्नायूंना आराम मिळतो. पुदिन्याच्या पानांमुळे अनेक रोग दूर होतात. पुदिना चटणी जर समोशाबरोबर सेवन केली तर त्यामुळे चवच वाढते असे नव्हे तर पचनही चांगले होते. पुदिना वनस्पतीमुळे पोटात शांत वाटते व आग होत नाही. शरीराचे तापमान वाढत नाही. या सगळ्याचा संबंध डोकेदुखी व अर्धशिशी यांच्याशी असतो. मुख आरोग्यात पुदिना गुणकारी असून त्यात जंतुनाशक गुण असतात, परिणामी तोंडातील घातक जिवाणू मारले जातात व जीभ, दात स्वच्छ राहतात. पुदिना कफ व सर्दीवर उपयुक्त आहे. त्वचारोगांवरही पुदिना उपयोगी असून त्यामुळे त्वचेची आग कमी होते व कीटकदंश, इतर ॲलर्जीने होणारे दुष्परिणाम टळतात. पुदिना ही पचनासाठी उपयुक्त वनस्पती असून त्यामुळे गॅस होणे टळते, अपचन, उलट्या व अतिसारापासून संरक्षण मिळते. पुदिन्याची पाने पाण्यात काही तास भिजवून नंतर खावीत व त्याचा अर्क जास्त उपयुक्त असतो.



# सरबत बनवताना लक्ष देण्यासारख्या काही गोष्टी...

- ज्याचे सरबत बनवायचे त्याचा रस किंवा काढा १ वाटी, पाणी १ वाटी, साखर २ वाटी घ्यावी.
- पाणी व साखर एकत्र करून उकळावं.
- उकळी येऊन फेस शांत झाला व मिश्रण स्वच्छ दिसू लागलं की गॅस बंद करावा.
- त्यात आधी तयार करून ठेवलेला रस / काढा मिसळावा आणि ढवळावा.
- नंतर हे मिश्रण गाळून स्वच्छ, कोरड्या बरणीत भरून ठेवावं. यालाच सरबताचं 'कॉन्सन्ट्रेट' म्हणतात.

**चंदन, वाळा सरबत**

**घटक :** चंदन पूड १० ग्रॅम, वाळा पावडर १० ग्रॅम, पाणी १०० मिली. साखर २०० ग्रॅम.

**कृती :** पाणी उकळल्यावर गॅस बंद करावा. उकळलेल्या पाण्यात चंदन व वाळा पावडर टाकून ते झाकून ठेवावं. दोन तासांनं मिश्रण चांगलं ढवळून घ्यावं. नंतर ते गाळून घेऊन मोजावं. १ वाटीच्या मिश्रणास दोन वाटी साखर आणि एक वाटी पाणी घ्यावं. पाणी व साखर एकत्र उकळून घ्यावं. उकळी येऊन फेस शांत झाला आणि मिश्रण स्वच्छ दिसू लागलं की गॅस बंद करावा. त्यात चंदन वाळ्याचं तयार केलेलं मिश्रण टाकून ते चांगलं ढवळावं. सरबताचं हे सिरप गाळून कोरड्या बरणीत भरून ठेवावं.



**उपयोग**

दाहशामक, डोळ्यांची आग, लघवीची आग कमी करतं. सतत तहान लागणं, ज्वर यासारख्या उन्हाळ्यातील तक्रारीत उपयुक्त.

# आईला गर्भाशयाचा कर्करोग असल्यास जन्माला येणाऱ्या मुलाला डोळ्याचा कर्करोग होण्याची शक्यता

**कुटुंबातील** एखाद्या सदस्याला डोळ्याचा कर्करोग असल्यास पुढील पिढीतील लहान मुलालादेखील हा आजार होण्याची दाट शक्यता असते. अनुवंशिक आजार होण्याचे प्रमाण ३० टक्के आहे. मात्र, ७० टक्के मुलांना कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना हा आजार झाल्याचे निदर्शनास आले आहे. आईला गर्भाशयाचा कर्करोग असल्यास जन्माला येणाऱ्या मुलाला डोळ्याचा कर्करोग होण्याची दाट शक्यता असते. आईच्या गर्भाशयाच्या कर्करोगाला कारणीभूत 'ह्युमन पॅपिलोमा' हा व्हायरस या मुलाच्या जन्माच्या वेळी त्यांच्या डोळ्यांना बाधा निर्माण करतो. त्यामुळे मुलांना डोळ्याचा कर्करोग होतो. डोळ्यांच्या कर्करोगाचे (रेटिनोब्लास्टोमा) प्रमाण लहान मुलांत सर्वाधिक असून भारतात दरवर्षी या आजाराचे दोन ते अडीच हजार रुग्ण आढळतात. साधारणतः सहा वर्षांच्या आतील मुलांना हा आजार होत असला तरी या आजाराची लागण झालेल्या मुलांवर तत्काळ उपचार केल्यास त्यातून त्यांची मुक्तता करता येते. मात्र ६० टक्के मुलांच्या आजाराचे निदान वेळेत होत नसल्याने त्यांच्यावर उपचार करणे कठीण होते. डोळ्यांच्या ट्यूमरने ग्रस्त रुग्णांच्या संख्येत दोन ते तीन पटीने वाढ झाली आहे. विकसित देशांत रेटिनोब्लास्टोमा होऊनही त्यातून बचावणाऱ्या मुलांचे प्रमाण ९५ टक्के आहे.



**आजाराचा धोका**

डोळ्यांचा कर्करोग लहान मुलांत आढळतो. या आजाराच्या एकूण प्रकरणांपैकी दोनतृतीयांश प्रकरणे वय वर्षे दोनहून कमी वय असलेल्या मुलांत दिसून आली आहेत. तर ९५ टक्के प्रकरणे वय वर्ष पाचहून कमी वय असलेल्या मुलांबाबत आहेत.

**लक्षणे**

▮डोळे तिरळे होणे किंवा डोळे सारखे हलणे

▮एकाच किंवा दोन्ही डोळ्यांतील दृष्टी मंदावणे

▮दोन्ही डोळ्यांत वेगवेगळ्या रंगांची बुब्बुळ असणे

▮डोळ्यातल्या बाहुल्या आकाराने मोठ्या भासणे किंवा लाल होणे आणि त्यासह डोळ्यांत तीव्र वेदना होणे

**निदान कसे करावे**

डोळ्यांचा कर्करोग झाल्यास नेत्रचिकित्सकाकडून डोळ्यांची तपासणी आणि इमेजिंग टेस्ट करून घ्याव्यात. त्यातून रेटिनोब्लास्टोमा आहे किंवा नाही, याचे निदान होऊ शकते. याशिवाय बायोमायक्रोस्कोपी, डोळ्यांची अँजिओग्राफी, सी.टी. स्कॅन, एमआरआय, पेटस्कॅन, बायॉप्सी या तपासण्यांच्या सहाय्याने डोळ्याच्या कर्करोगाचे निदान निश्चित होते. डोळ्यांच्या कर्करोगावर रेडिएशन, केमोथेरपी आणि लेझरथेरपी यांच्या सहाय्याने उपचार केले जातात. या उपचारपद्धती आवश्यक असल्या तरी डोळा शस्त्रक्रिया करून काढून टाकावा लागतो. तसेच रेडिएशनमुळे मोतिबिंदू किंवा डोळा पूर्णतः कोरडा होणे, हे दुष्परिणाम दिसून येतात. डोळ्यांचा कर्करोग झालेल्या १० मुलांपैकी ९ मुलांचा रेटिनोब्लास्टोमा पूर्णपणे बरा करता येतो. ट्यूमर डोळ्यांच्या बाहेर पसरला नसेल तर रेटिनोब्लास्टोमा झालेले रुग्ण बरे होऊन भविष्यात निरोगी आयुष्य जगू शकतात.

# नाल्यात प्लास्टिकच्या बाटल्यांसह पिशव्यांचा खच
## वसई विरारमध्ये आरोग्य आणि पर्यावरणाचा गंभीर प्रश्न

■ **बातमी /लेख, विनोद दशगथ मेढे**

वसई विरार शहरात असलेल्या नाल्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली असून नाल्यांमध्ये प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या, कचरा आणि घाणीचा मोठा खच साचल्याचे चित्र दिसून येत आहे. नियमित स्वच्छता न केल्याने नाले भरून वाहण्याच्या स्थितीत पोहोचले असून त्यामुळे परिसरातील नागरिकांना दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि अस्वच्छतेचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वसई विरार महापालिकेच्या हद्दीतील अनेक भागात नाल्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने ही समस्या गंभीर रूप धारण करते आहे.

शहरातील वाढती लोकसंख्या, वाढलेले नागरीकरण आणि अनियंत्रित कचरा व्यवस्थापन यामुळे नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिक साचत आहे. विशेषतः प्लास्टिकच्या पिशव्या आणि बाटल्या नाल्यांमध्ये अडकून राहिल्याने पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी पाणी साचून




राहते आणि त्यावर घाणीचा थर तयार होतो. काही ठिकाणी नाले पूर्णपणे बुजल्यासारखी स्थिती निर्माण झाली असून पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही बाब अधिक धोकादायक ठरण्याची शक्यता आहे.

नाल्यांच्या आजूबाजूला राहणाऱ्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दुर्गंधीमुळे श्वसनाचे आजार, त्वचारोग, तसेच डासांमुळे मलेरिया, डेंग्यूसारख्या आजारांचा धोका वाढला आहे. लहान मुले, वृध्द नागरिक आणि आजारी व्यक्तींना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. काही नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही महापालिकेकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप केला जात आहे.

वसई विरार शहर महापालिकेच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात नाले असतानाही त्यांची नियमित साफसफाई होत नसल्याचे वास्तव समोर येत आहे. काही ठिकाणी महिनोन्माहीने नाल्यांची स्वच्छता न झाल्याने कचऱ्याचे ढिगारे तयार झाले आहेत. कचरा थेट नाल्यात टाकणाऱ्या नागरिकांवर कारवाई होत नसल्याने ही समस्या आणखी वाढत आहे.

नागरिकांकडून नाल्यांची तातडीने साफसफाई करावी, प्लास्टिक कचऱ्यावर नियंत्रण आणावे तसेच नियमित देखरेख यंत्रणा राबवावी, अशी मागणी होत आहे. अन्यथा पावसाळ्यात नाले तुंबून वाईट परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारतां येत नाही. आरोग्य आणि पर्यावरणाच्या दृष्टीने ही समस्या गंभीर असून महापालिकेने तातडीने लक्ष देणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



### वसई-विरारमध्ये वायू प्रदूषणाने धोक्याची पातळी ओलांडली

मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) वाढत चाललेल्या वायू प्रदूषणाने धोक्याची पातळी ओलांडली असताना वसई-विरार शहरात मात्र परिस्थिती अधिकच गंभीर होत चालली आहे. शहराचा वायू गुणवत्ता निदेर्शांक (एक्यूआय) १५० च्या पुढे गेला असतानाही वसई-विरार महापालिका प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांच्या आरोग्याबाबत तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. प्रदूषणामुळे श्वास घेणेही कठीण झाले असून, शहराचा अक्षरशः श्वास कोंडल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. मुंबईतील प्रदूषणाच्या मुद्द्यावर उच्च न्यायालयाने अलीकडेच कडक भूमिका घेत पालिका प्रशासनाला धारेवर धरले होते. त्याच पार्श्वभूमीवर वसई-विरार महापालिकेच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरात सुरू असलेली मोठ्या प्रमाणावरील बांधकामे, रस्ते खोदकामे, जलवाहिनी प्रकल्प आणि अवजड वाहनांची बेशिस्त वाहतूक यामुळे हवेत धुळीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. मात्र या सर्वांवर नियंत्रण ठेवण्यात महापालिका अपयशी ठरत असल्याचा आरोप होत आहे. बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी धूळ हवेत पसरू नये म्हणून ह्लग्रीन नेटह्ल लावणे, पाणी फवारणी करणे आवश्यक असताना अनेक विकासक हे नियम सर्रास धुडकवत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, महापालिकेकडूनच करण्यात येर्णाया तोडकाम आणि खोदकामाच्या वेळीही संरक्षणात्मक उपाययोजना केल्या जात नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ह्लपालिका स्वतःच नियम पळत नसेल, तर खाजगी बांधकाम व्यवसायिकांकडून काय अपेक्षा करायची ?ह्ल असा सवाल उपस्थित केला जात आहे. प्रदूषण नियंत्रणासाठी महापालिकेने राष्ट्रीय हवा शुद्धीकरण उपक्रमांतर्गत कोट्यवधी रुपये खर्चून फॉग कॅनन वाहने खरेदी केली आहेत. सुमारे तीन कोटी रुपयांची ही यंत्रणा हवेत उडणारे धूलिकण कमी करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. मात्र प्रत्यक्षात ही वाहने शहरभर फिरताना क्वचितच दिसतात. अनेकदा ही यंत्रणा महापालिका मुख्यालयाच्या आवारातच उभी असल्याचे चित्र आहे. त्यामुळे वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण कसे आणणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## तापमानाचा पारा चढला, २०२६ मधील सर्वाधिक उष्ण दिवस
# 'या' भागांत ३४°C वर तापमान



■ **मुंबई। प्रतिनिधी,**

महाराष्ट्रात जानेवारी महिन्याच्या अखेरीसच थंडी कमी होऊ लागली होती. फेब्रुवारीच्या सुरूवातीला तर अनेक जिल्ह्यात पावसाने हजेरी लावली. पण आता येत्या काही दिवसांत मुंबईसह परिसरातील भागांत उष्णतेची लाट जाणवणार आहे. बुधवारी मुंबई उपनगरातील अनेक भागांत २०२६ची पहिली उष्णनतेची लाट अनुभवायला मिळणार आहे. मंगळवार सकाळपासून मुंबईसह उपनगरात वातावरणात थंडीची तीव्रता कमी झालेली जाणवू लागली आहे. पहाटे काही ठिकाणी धुकं दाटलेलं सुद्धा दिसून आलं होतं. परंतु, फेब्रुवारीच्या सुरुवातीपासूनच किमान तापमानात वाढ झाल्याचं दिसून येत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार आज दिवसभर शहरात आकाश निरभ्र राहण्याची शक्यता आहे. तसेच, आज किमान तापमान २३ अंश सेल्सियस असून, कमाल ३२ अंश सेल्सियस असेल. हिवाळ्याच्या सुरूवातीपासूनच शहरात हवेची गुणवत्ता ढासाळली आहे. गेल्या काही दिवसांपासून वायू प्रदुषणाच्या पातळीत चढ-उतार होत असून, स्थानिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

## बदलापूरमध्ये अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर
# ४०० हून अधिक बांधकामे हटवणार



■ **बदलापूर।प्रतिनिधी,**

नगरपालिका निवडणुकांनंतर बदलापूर शहरात प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून, अनधिकृत बांधकामांविरोधात मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू करण्यात आली आहे. अंबरनाथझबदलापूर महामार्ग आणि पनवेल महामार्गालगत उभारण्यात आलेल्या अनधिकृत इमारती व व्यावसायिक गाळ्यांवर आज नगरपालिकेने बुलडोझर चालवला. या अचानक सुरू झालेल्या कारवाईमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.

गेल्या काही वर्षांत बदलापूरच्या झपाट्याने होणाऱ्या शहरीकरणामुळे अनधिकृत बांधकामांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले होते. विशेषतः मुख्य रस्त्यालगत उभारलेली दुकाने, गाळे आणि तात्पुरत्या स्वरूपातील बांधकामांमुळे वाहतूक, सौंदर्य आणि सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. याच पार्श्वभूमीवर आता नगरपालिकेने कठोर भूमिका घेतली आहे.

पालिकेच्या माहितीनुसार, ही कारवाई पुढील ८ ते १० दिवस सलग सुरू राहणार असून, शहरातील सुमारे ४०० पेक्षा अधिक अनधिकृत बांधकामे हटवण्याचा* निर्णय घेण्यात आला आहे. या मोहिमेअंतर्गत कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

पालिकेचे मुख्याधिकारी 'मारुती गायकवाड' यांनी सांगितले की, मुंबई उच्च न्यायालयाच्या निदेर्शानुसार ही कारवाई राबवली जात आहे. "अनधिकृत बांधकामांमुळे शहराचा नियोजित विकास खुंटतो. त्यामुळे नियमबाह्य बांधकामांवर कठोर कारवाई केली जाणार आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या कारवाईचे शहरातील अनेक नागरिकांनी स्वागत केले आहे. अनधिकृत बांधकामांमुळे सार्वजनिक जागा अडवल्या जात होत्या, तसेच वाहतूक कोंडी आणि अपघातांचा धोका वाढत होता, अशी नागरिकांची तक्रार होती. मात्र, काही नागरिकांनी ही कारवाई सातत्याने सुरू राहावी आणि भविष्यात पुन्हा अशी बांधकामे उभी राहू नयेत, अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे.

यापूर्वी अनेक वेळा कारवाईनंतर काही महिन्यांतच त्याच ठिकाणी पुन्हा अनधिकृत बांधकामे उभी राहत असल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. त्यामुळे यावेळी प्रशासन ही मोहीम कितपत प्रभावीपणे राबवते, याकडे संपूर्ण बदलापूरचे लक्ष लागले आहे.


## ठाण्यातील भव्य त्रिमंदिर भाविकांसाठी खुले
# तीन दिवसांच्या प्राणप्रतिष्ठेनंतर दर्शनास सुरुवात

■ **ठाणे। प्रतिनिधी,**

ठाणे शहरात उभारण्यात आलेले भव्य त्रिमंदिर अखेर भाविकांसाठी खुले करण्यात आले आहे. तीन दिवस चाललेल्या प्राणप्रतिष्ठा विधीनंतर हे मंदिर सर्वसामान्य भक्तांसाठी दर्शनासाठी खुले झाले असून, ठाण्यातील नवे अध्यात्मिक केंद्र म्हणून या मंदिराकडे पाहिले जात आहे. मुंबई महानगर प्रदेशातील हे सर्वात मोठे त्रिमंदिर मानले जात आहे.

ठाणे पश्चिमेकडील बाळकूमझसाकेत रोड परिसरात सुमारे १.५ एकर क्षेत्रफळावर या त्रिमंदिराची उभारणी करण्यात आली आहे. महावीर जैन ट्रस्ट आणि दादा भगवान फाउंडेशन यांच्या संकल्पनेतून हे मंदिर साकारले असून, धार्मिक समन्वय आणि सर्वधर्मीय ऐक्याचा संदेश देणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

या त्रिमंदिरात एकाच व्यासपीठावर विविध धर्मांचे आराध्य दैवत विराजमान करण्यात आले आहेत. यामध्ये *जैन धमार्चे श्री सीमांधर स्वामी, शैव धमार्चे भगवान शिव, तसेच वैष्णव परंपरेतील भगवान कृष्ण यांच्यासह एकूण २५ पूजनीय देवतांची स्थापना करण्यात आली आहे. विविध धर्मांमधील निपक्षपातीपणा आणि समतेची भावना जपण्याचा प्रयत्न या मंदिररचनेतून दिसून येतो.



मंदिराच्या स्थापत्यशैलीकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. हे मंदिर जयपूर येथून आणलेल्या पांढऱ्या संगमरवरी दगडापासून बांधण्यात आले असून, त्याची कलात्मक रचना भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. मंदिरातील प्रमुख आकर्षण असलेल्या श्री सीमांधर स्वामी यांच्या मूतीर्ची उंची सुमारे १३ फूट असून, तिचे वजन अंदाजे १८ हजार किलो असल्याची माहिती देण्यात आली आहे.

हे त्रिमंदिर केवळ श्रद्धेचे केंद्र नसून सामाजिक समता, धार्मिक सलोखा आणि अध्यात्मिक शांततेचे प्रतीक आहे. मंदिर सुरू झाल्याने ठाणे शहरातील भाविकांमध्ये समाधान व्यक्त केले जात असून, पुढील काळात हे ठिकाण अध्यात्मिक पर्यटनाचेही महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे.


# मेट्रो- ४ मार्गिकेच्या कामाला गती

■ **मुंबई। प्रतिनिधी,**



महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) वडाळा-ठाणे-कासारवडवली मेट्रो ४ मार्गिकेच्या कामातील एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण करण्यात आला. या मार्गिकेच्या कामाअंतर्गत भांडुप पश्चिम येथे एकूण ३२५ मेट्रीक टन वजनाचे तीन भव्य स्टील स्पॅन्स यशस्वीरीत्या स्थापित करण्यात आले आहेत. या कामामुळे मेट्रो ४ मार्गिकेच्या कामाला आता गती येणार आहे. मुंबई रात्रीच्या अंधारात विसावलेली असतानाच मेट्रो मार्गिका ४ ने एक महत्त्वपूर्ण टप्पा यशस्वीपणे पार केला. भांडुप पश्चिम येथे एकूण ३२५ मेट्रिक टन वजनाचे ३ भव्य स्टील स्पॅन्स यशस्वीरीत्या लॉन्च करण्यात आले. ८ हेवी ड्यूटी क्रेन्स आणि १२ मल्टी-ॲक्सल वाहनांच्या सहाय्याने हे स्टील स्पॅन्स अत्यंत अचूकपणे आणि कौशल्याने बसवण्यात आले. या कामासाठी महानगरपालिका (बीएमसी), बेस्ट, भांडुप वाहतूक पोलीस, भांडुप पोलीस तसेच परिसरातील रहिवासी व दुकानदार यांच्यासोबत एमएमआरडीएने उत्कृष्ट समन्वय साधला. उत्कृष्ट नियोजन आणि समन्वयामुळे चार रात्री लागणारे हे काम अवघ्या दोन रात्रींमध्ये पूर्ण करण्यात यश आले, अशी माहिती एमएमआरडीएने दिली. या कामासाठी ३५ अभियंते, १०० हून अधिक कुशल कामगार, ७० वाहतूक वॉर्डन आणि २५ हून अधिक पोलीस कर्मचारी तैनात होते. योग्य नियोजनामुळे भव्य असे तीन स्टील स्पॅन्स यशस्वीरित्या स्थापित करण्याचे आव्हान या पथकामुळे पेलता आले. या कामाच्या अनुषंगाने आता मेट्रो ४ मार्गिकेतील कामाला गती मिळणार आहे. गायमुख ते कॅडबरी जंक्शन पहिल्या टप्प्यानंतर पुढील टप्पे वेगाने पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे एमएमआरडीएने स्पष्ट केले.

# लोणावळ्यातील टायगर पॉईंटच्या ४०० फूट खोल दरीत उडी मारत तरुणीनं संपवलं जीवन



■ **बीड।प्रतिनिधी,**

मुंबईत एलएलबीचे शिक्षण घेणाऱ्या एका तरुणीने लोणावळ्यातील टाइगर पॉइंट येथे ४०० फूट खोल दरीत उडी मारत आपलं जवन संपवलं. श्रेया नरेंद्र पाटील (वय २०) असे तरुणीचे नाव आहे. प्राथमिक तपासातून समोर आले की, तिने कौटुंबिक वादातूनच असं टोकाचं पाऊल उचललं आहे. ड्रोनच्या मदतीने ३६ तासांच्या शोधानंतर तिचा मृतदेह बाहेर काढण्यात आला होता. या प्रकरणात लोणावळा शिवदुर्ग बचाव पथकाने मोठ्या प्रयत्न ानंतर खोल दरीतून मृतेदह बाहेर काढण्याचे काम केलं. घडलेल्या घटनेनुसार, श्रेया ही ३१ जानेवारी रोजी ट्रेकिंगला जात असल्याचं सांगून घरातून निघाली होती. सकाळी ११ वाजताच्या सुमारास की लोणावळ्यात पोहोचली. ती प्रथम ड्यूक्स नोजवर गेली, नंतर खाली उतरली आणि टायगर पॉइंटला रिक्षा केली. तिने आपली बॅग एका स्टॉल मागे सोडून दिली होती. संबंधित प्रकरणात लोणावळा ग्रामीण पोलिसांनी माहिती दिली, श्रेयाने टायगर पॉइंटवरील रेलिंगजवळील तुटलेल्या तारांचे कुंपण ओलांडून थेट ४०० फूट खोल दरीत उडी मारली. श्रेया सायंकाळपर्यंत घरी परतली नाही, तिच्या कुटुंबियांनी तिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, तिचा फोन बंद लागला. बॅगमधील कपड्यांवरून श्वान पथकाने पोलिसांना श्रेयाने ज्या ठिकाणी उडी मारली होती त्या ठिकाणी नेले. टायगर पॉइंट परिसर खोल आणि दुर्गम असल्याने शोध घेणं कठीण होत आहे. दुसऱ्या दिवशी ड्रोनच्या मदतीने शोध पुन्हा सुरु करण्यात आला. लोणावळा शिवदुर्ग बचाव पथकाने देखील शोध घेतला. या घटनेच्या काही तासानंतर म्हणजे १ फेब्रुवारी रोजी अधिक काळ सुरु असलेल्या शोध मोहिमेनंतर श्रेयाचा मृतदेह एका खोल दरीत कोसळल्याची माहिती समोर आली.

# डिजिटल व्यसनावर टास्क फोर्स... माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांची माहिती

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

लहान मुलांमध्ये वाढत चाललेल्या डिजिटल व्यसनामुळे त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांचा सखोल अभ्यास करून त्यावर प्रभावी उपाययोजना सुचवण्यासाठी तज्ज्ञांची टास्क फोर्स नियुक्त करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती राज्याचे माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी सोमवारी दिली.

केंद्रीय अर्थ मंत्रालयाने २९ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या आर्थिक पाहणी अहवालात तरुण आणि अल्पवयीन मुलांमध्ये सोशल मीडिया व्यसनाचे वाढते धोके अधोरेखित करण्यात आले



आहेत. या अहवालात मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर वयोमयार्दा ठरवणे तसेच अल्पवयीनांना डोळ्यासमोर ठेवून केलेल्या डिजिटल जाहिरातींवर निर्बंध आणण्याची शिफारस करण्यात आली आहे.

प्रस्तावित टास्क फोर्सच्या कार्यक्षेत्रात मुलांचे संरक्षण आणि सुरक्षितता, मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम, डिजिटल प्लॅटफॉर्मचा संतुलित आणि जबाबदार वापर, शिक्षण आणि एकूण विकासावर होणारा परिणाम, सांस्कृतिक तसेच कौटुंबिक घटक, लिंगनिहाय फरक, ग्रामीण आणि शहरी परिस्थितीतील भेद, सर्व उत्पन्न गटांचा समावेश, उत्पादकता आणि व्यापक आर्थिक परिणाम तसेच मुलांच्या डिजिटल सुरक्षिततेसाठी अस्तित्वात असलेल्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चौकटींचा आढावा यांचा समावेश करण्याच्या सूचनाही शेलार यांनी केल्या आहेत.



### धोरण ठरवताना सखोल अभ्यास करावा

शेलार यांनी माहिती आणि तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव वीरेंद्र सिंह यांना तज्ज्ञांचा टास्क फोर्स नियुक्त करण्याबाबत लेखी निर्देश दिले आहेत. आर्थिक पाहणी अहवालातील शिफारशी आणि तज्ज्ञांनी मांडलेल्या पुराव्यांच्या आधारे राज्यासाठी संतुलित तसेच माहितीपूर्ण धोरण ठरवण्यासाठी विभागाने या विषयाचा सखोल अभ्यास करावा. त्यासाठी आवश्यक असल्यास सर्वांगीण अभ्यासासाठी तज्ज्ञांचा टास्क फोर्स स्थापन करावा, असे निर्देश शेलार यांनी दिले आहेत. या टास्क फोर्समध्ये शिक्षणतज्ज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ, बालसमुपदेशक, तंत्रज्ञान तज्ज्ञ, व्यवस्थापन तज्ज्ञ, डॉक्टर, कायदेतज्ज्ञ तसेच संबंधित शासकीय विभागांचे अधिकारी यांचा समावेश असणार आहे.

# बीड जिल्ह्यात चॉकलेटचं आमिष दाखवून ९ वर्षीय चिमुकलीवर ७० वर्षीय वृद्धाकडून लैंगिक अत्याचार

■ **बीड। प्रतिनिधी,**

बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील दिंद्रुड येथे माणुसकीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. इयत्ता चौथीत शिक्षण घेणाऱ्या नऊ वर्षाच्या चिमुकलीवर ७० वर्षीय नराधमाने लैंगिक अत्याचार केला. ही घटना २८ जानेवारी रोजी घडल्याचे वृत्त आहे. नराधमाने चिमुरडीला चॉकलेटचं आमिष दाखवून तिच्यावर हैवानी कृत्य केलं. पीडितेच्या आईने नराधमाविरोधात दिंद्रुड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. दिंद्रुड पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

पीडितेला चॉकलेटचं आमिष देऊन पीडितेवर लैंगिक अत्याचार

घडलेल्या घटनेनुसार, पीडित मुलीच्या आईने केलेल्या तक्रारीनुसार, धारून तालुक्यातील एका गावात शेतमजूर काम करणारे कुटुंब राहते, त्यांचीच मुलगी इयत्ता चौथीत शिक्षण घेते. २८ जानेवारी रोजी सकाळी ती शाळेत जाताना आपल्या मैत्रिणीकडे गेली असता, रस्त्यात एक आरोपी बाबुराव केरबा निरडे याने तिला चॉकलेटचं आमिष देऊन घरात नेलं. नंतर त्याने घराची कडी लावून चिमुकलीच्या अंगावरील सर्व कापडे काढून तिच्यावर अत्याचार केला. या घटनेनं पीडित मुलगी भयभीत झाली, घटनास्थळावरून तिने शाळेत पळ काढला.

या प्रकरणात दिंद्रुड पोलिसांना घटनेची सर्व माहिती सांगितली होती. नराधमाने बाबुराव केरबा निरडेविरुद्ध दिंद्रुड पोलिसांनी भारतीय न्यायसंहिता आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती फिर्यादीच्या आईने दिली.

पोलिसांनी या प्रकरणाची तत्काळ दखल घेत आंबेजोगाई येथून फरार आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतलं. केज पोलीस ठाण्यात दाखल करत आरोपी बाबुराव निरडेची बीड जिल्हा कारागृहात रवानगी केल्याची माहिती सपोनी महादेव ठाकणे यांनी दिली होती.




# उसन्या पैशांच्या वादातून मित्राचाच काढला काटा... अवघ्या २४ तासांत प्रकरणाचा छडा

■ **बीड।प्रतिनिधी,**

बीडमध्ये एका तरुणाने पैशांच्या वादातून आपल्याच मित्राचा डोक्यात दगड घालून त्याचा खून केल्याचं धक्कादायक वृत्त समोर आलं आहे. या घटनेतील आरोपीला जेरबंद करण्यात बीड स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आलं असून अवघ्या २४ तासांच्या आत या खुनाचा छडा लावून पोलिसांनी आरोपी अतिक गुलाब तांबोळी याला अटक केल्याची माहिती आहे.

रक्ताच्या थारोळ्यात तरुणाचा मृतदेह

पाटोदा पोलीस स्टेशन हद्दीतील दगडवाडी गावच्या शिवारात, बीड ते शिरूर रोडवर दि. २ फेब्रुवारी रोजी सकाळी एका तरुणाचा रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह आढळला होता. व्यवसायाने पेंटर असलेला चाँद अल्हाहुद्दीन तांबोळी (वय ३०, रा. रायमोहा, ता. शिरूर) याचा एका अज्ञात इसमाने डोक्यात दगड मारून खून



केला होता. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती आणि पाटोदा पोलीस ठाण्यात खुनाचा (बीएनएस कलम १०३) गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**पोलिसांचं तपासाचं चक्र**

अज्ञात आरोपीविरुद्ध कोणतेही पुरावे नसताना हा गुन्हा उघडकीस आणणं हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होतं. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी तपासासाठी विशेष पथक तैनात केलं. गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय बातमीदार आणि तांत्रिक विश्लेषणाची मदत घेतली. तपासादरम्यान संशयाची सुई अतिक गुलाब तांबोळी (रा. ईस्लामपुरा पेठ, बीड) याच्याकडे वळली. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला बीडच्या शासकीय रुग्णालय परिसरातून ताब्यात घेतलं. सुरुवातीला आरोपीने पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र पोलिसांच्या कठोर चौकशीत त्याने आपला गुन्हा कबूल केला. आरोपी अतिकने मृत चाँद तांबोळी याच्याकडून काही पैसे हातउसणे घेतले होते. चाँद हा वारंवार आपल्या पैशांची मागणी करत तगादा लावत होता. याच वादातून संतापलेल्या अतिकने चाँदचा काटा काढण्याचं ठरवलं आणि दगडवाडी शिवारात डोक्यात दगड घालून त्याची हत्या केली.

ही कारवाई पोउपनि सुशांत सुतळे, श्रीराम खटावकर, अंमलदार अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, राहुल शिंदे, मारुती कांबळे, युनूस बागवान, अशफाक, परझणे, शेख आणि चालक हराळे यांच्या पथकाने केली. आरोपीला पुढील तपासासाठी पाटोदा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com